cmyk

## संपादकीय

### एनडीए सरकारला बेरोजगारीचे आव्हान पेलावेच लागेल !

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नव्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारसमोर बेरोजगारी आणि रोजगाराची संधी निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे. अलिकडेच फ्रान्सच्या 'कॉर्पोरेट अँड इन्व्हेस्टमेंट बँक नेटिक्सि एसए' ने जारी केलेल्या अहवालात भारतात वेगाने तरुण रोजगारासाठी तयार होत असून ते नव्याने बेरोजगारीत सामील होत आहेत. त्यामुळे २०३० पर्यंत दरवर्षी सुमारे १.६५ कोटी नव्या रोजगाराची गरज भासणार आहे. यात सुमारे १.०४ कोटी नोक-या संघटित क्षेत्रात तयार कराव्या लागणार आहेत.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### मुस्लिम समाजातील 'या' महिलांना लाभ देऊ नका-प्रकाश महाजन

संभाजीनगर: ज्या लोकांना दोन बायका आहेत, ज्या लोकांना दोन पेक्षा जास्त अपत्य आहेत, त्यांना या योजनेचा लाभ देऊ नये. कारण या देशात लोकसंख्येचा स्फोट कधी ना कधी होणार आहे. अतिरिक्त लोकसंख्येचा भार, जे लोकं लोकसंख्या नियंत्रित करतात, दोन मुलांपेक्षा जास्त अपत्य वाढू देत नाहीत, त्यांचा कराचा पैसा, जे दोन पेक्षा जास्त अपत्य जन्माला घालतात त्यांच्यावर का खर्च करायचा?, असा सवाल मनसे नेते प्रकाश महाजन यांनी केला आहे. प्रकाश महाजन यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावरही टीका केली आहे. राहुल गांधी यांची अवस्था म्हणजे माँ माली, बाप तेली, बेटे निकले सय्यद अली अशी आहे. राहुल गांधी यांच्या हिंदु धर्माशी संबंध नाही. त्यांनी आमच्या धर्मावर बोलू नये, असा घणाघात प्रकाश महाजन यांनी केला.

बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-८४ गुरूवार दि.४ जुलै २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने- ६ किंमत ३ रूपये

# महिला मजुर मिळेना, शेतकऱ्यांची कामे खोळंबली

## लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांची धावपळ

**बीड। प्रतिनिधी**

**सध्या या योजनेसाठी लागणारी कागदपत्रे मिळवण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांची तलाठी आणि तहसीलदार कार्यालय परिसरात मोठी गर्दी आहे. पेरणीच्या दिवसात शेतमजूर महिला कागदपत्रे गोळा करण्यात व्यस्त आहेत. त्यामुळे शेतात महिला मजूर मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. सध्या कापूस खुरपणी सुरु असल्याने महिला मजूरांच्या शेतकरी शोधात असून गावभर फिरले तरी मजूर मिळत नसल्याचे चित्र आहे.**



राज्यातील महिलांना दिलासा मिळावा यासाठी राज्य सरकारने लाडकी बहीण योजना जाहीर केली आहे. या योजनेस पात्र असणाऱ्या महिलांना दरमहा १५०० रुपये मिळणार आहेत. दरम्यान, सध्या या योजनेसाठी लागणारी कागदपत्रे मिळवण्यासाठी सध्या ग्रामीण भागातील महिलांची तलाठी आणि तहसीलदार कार्यालय परिसरात मोठी गर्दी झाल्याचे दिसत आहे. पेरणीच्या दिवसात शेतमजूर महिला या शेतीकाम सोडून कागदपत्रे गोळा करण्यात व्यस्त झाल्या आहेत. शेतकऱ्यांचा शेतात पेरणी, निंडणी आणि खत देण्याच्यासाठी शेतमजूर महिला मिळेनाशा झाल्या आहेत. या योजनेचे निकष पूर्ण करण्यासाठी काही पान २ वर

## पोर्टल अपडेट नाही, नोटिफिकेशन नाही अर्ज भरायचा कसा?

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या ऑनलाईनचा बोजवारा

शासनाने मोठा गाजावाजा करुन मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण ही योजना सुरु केली. दररोज त्यावर चर्चा सुरु असून महिलांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे. महिलांची कागदपत्रे जमा करण्यासाठी सेतु केंद्र, तहसिल कार्यालय, तलाठी कार्यालयावर गर्दी होताना दिसत आहे. मात्र अद्याप योजनेचे पोर्टल अपडेट नाही, नोटिफिकेशन नाही त्यामुळे सध्या




तरी या योजनेचा ऑनलाईन बोजवारा उडाला असल्याचे दिसत असून अर्ज भरायचा कसा? पान २ वर

## सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश मिळणार

### देवेंद्र फडणवीसांची घोषणा



**मुंबई। प्रतिनिधी**

मुलींच्या शिक्षणासाठी ५० टक्क्यांची शिष्यवृत्ती होती, आता १०० टक्के देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. विरोधी पक्षनेत्यांनी विद्यार्थ्यांच्या गणवेशाबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. पहिल्यांदा सरकारने निर्णय केला की, सर्व विद्यार्थ्यांना त्यांची जात-धर्म न पाहाता १०० टक्के विद्यार्थ्यांना गणवेश दिला जाईल. त्या संदर्भात पारदर्शक पद्धतीने प्रक्रिया राबवण्यात आली. शिवाय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत ड्रसच्या क्वालीटीमध्ये कोणता फरक पडला आहे, हे देखील सांगितले आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते विधानपरिषदेत बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या गणवेशाच्या प्रश्नाला उत्तर दिले आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, काही योजना देखील माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केल्या आहेत. त्यामध्ये मुख्यमंत्री तीर्थ योजना आहे. राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना तीर्थ दर्शन करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री वयोश्री योजना आहे. ज्यामध्ये केंद्र सरकारच्या वयोश्री योजनेमध्ये जे गॅझेट नाहीत, पण ६० वर्षांच्या वरिल लोकांना लागतात. ते सर्व गॅझेट राज्यातील वयोश्री योजनेतून देण्यात येणार आहेत. राज्य सरकारने गेल्या सव्वादोन वर्षात महाराष्ट्राला पहिल्या क्रमांकावर ठेवले आहे. गुंतवणुकीत पहिल्या क्रमांकावर ठेवत आहे. अर्थव्यवस्थेचाही पान २ वर

# 'लाडकी बहीण' योजनेसाठी अडवणूक, दिरंगाई, पैशांची मागणी केल्यास कठोर कारवाई

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा ईशारा; जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवावे

**मुंबई। प्रतिनिधी**

**'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देणे, अर्ज भरुन घेणे यासह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक केल्यास, प्रक्रियेत दिरंगाई केल्यास किंवा योजनेच्या लाभासाठी महिलांकडून पैशांची मागणी करीत असल्याचे निदर्सनास आल्यास अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्याचबरोबर ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि जलदगतीने होईल यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावे, या योजनेचे संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले आहेत.**

त्याचबरोबर योजनेसंदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन देणे किंवा फॉर्म भरुन देण्याचे निमित्त करुन निर्माण होणारे दलाल अजिबात खपवून घेतले जाणार नाहीत. एखाद्या कार्यालयात असा प्रकार निदर्शनास आल्यास संबंधित कार्यालय प्रमुखावर पान २ वर




### आम्ही लाडक्या भावांचाही निर्णय घेतला; महिन्याला १० हजार देतोय मुख्यमंत्री शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर पलटवार

राज्य सरकारच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेवरुन सध्या राज्यात राजकीय जुगलबंदी पाहायला मिळत आहे. महायुती सरकारच्या या निर्णयाचं सर्वच स्तरातून स्वागत होत असून महिलांनी सेतू कार्यालयाबाहेर आणि संबंधित कार्यालयाबाहेर योजनेचा अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी केली आहे. त्यामुळे, राज्य सरकारकडून अधिक चांगल्या, सहज व सुलभपणे ही योजना राबविण्यासाठी नियमांत काही अनुकूल बदलही करण्यात आले आहेत. दुसरीकडे या योजनेचं स्वागत करताना विरोधकांनी राज्य सरकारला टोलाही लगावला. त्यावरुन, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी सभागृहातूनच पलटवार केला आहे.

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प सादर केल्यानंतर, त्यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेची माहिती दिली. सरकारच्या या निर्णयाची चांगलीच पान २ वर

### ..तर तुमचा अर्ज बाद होणार, हमीपत्र वाचले का?

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या अर्जाच्यासोबत हमीपत्र देखील जोडण्यात आलं आहे. या हमीपत्रात महिलांना काही गोष्टींची हमी देणं बंधनकारक असणार आहे. विशेष म्हणजे हे हमीपत्र वाचलं तर या योजनेबाबतच्या काही गोष्टी जास्त स्पष्टपणे समजतात. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा अर्ज आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या अर्जाच्यासोबत हमीपत्र देखील जोडण्यात आले आहे. या हमीपत्रात महिलांना काही गोष्टींची हमी देणं बंधनकारक असणार आहे. विशेष म्हणजे हे हमीपत्र वाचले तर या योजनेबाबतच्या काही गोष्टी जास्त स्पष्टपणे समजतात. या योजनेचा लाभ ज्या महिलांना मिळेल त्यांच्यासाठी अनेक अटी ठेवण्यात आल्या आहेत. यातील महत्त्वाची अट म्हणजे लाभार्थी महिलेच्या कुटुंबाचे वार्षित उत्पन्न हे अडीच लाखांपेक्षा जास्त नसावे. संबंधित महिलेच्या कुटुंबातील सदस्य हा आयकरदाता नसावा. महिला किंवा तिच्या कुटुंबातील व्यक्ती सरकारी कर्मचारी नसावे. तसेच महिलेने शासनाच्या कोणत्याही योजनेचा १५०० पेक्षा जास्त रुपयांचा आर्थिक लाभ घेतलेला नसावा. या सर्व अर्जाच्या हमीपत्रातून स्पष्ट होत आहेत. त्यामुळे या योजनेसाठी अर्ज दाखल करणाऱ्या सर्वच महिलांचे अर्ज पात्र होणे तितके सोपे नाहीत. कारण प्रत्येक नियम या अर्जात पाहिले जाणार आहेत. नियमात बसत असणाऱ्या लाभार्थी आणि गरजू महिलांनाच या योजनेचा फायदा मिळणार आहे.

### अब्दुल हाफिज यांचा राजीनामा

हिंगोली : विधानपरिषद निवडणुकांच्या उमेदवारीवरुन काँग्रेसमध्ये नाराजीनाट्य रंगल्याचं पाहायला मिळत आहे. काँग्रेसकडून पुन्हा एकदा प्रज्ञा सातव यांना विधानपरिषदेची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. प्रज्ञा सातव यांच्या नावाचा प्रस्ताव पान २ वर

## आ.रोहित पवार यांच्या असंवेदनशील वक्तव्याचा परळीकरांकडून तीव्र निषेध

### सरपंच बापू आंधळे हत्या प्रकरणातील आरोपींना अटक करण्याच्या मागणीसाठी परळी शहर कडकडीत बंद

**परळी वैद्यनाथ। प्रतिनिधी**

**धनंजय मुंडे समर्थक असलेले अजित पवार गटातील परळी तालुक्याच्या मरळवाडी चे सरपंच बापू आंधळे यांची निर्घृण हत्या करण्यात आल्याच्या नंतर त्यावर संवेदनशीलता व्यक्त करत बापू आंधळे यांच्या कुटुंबीयांच्या प्रती सहानुभूती दाखवण्याच्या ऐवजी केवळ चामडी बचावचे राजकारण करणारे आमदार रोहित पवार यांच्या विरोधात आज सबंध परळी शहरांमध्ये तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.**



वाचाळ वीर, बाष्कळ गप्पा मारणारे आमदार रोहित पवार यांनी बापू आंधळे यांच्या निर्घृण हत्येचे आरोपी असलेले अट्टल गुन्हेगार यांना अटक करण्याची मागणी करणे ऐवजी उलट राजकारणाच्या हव्यासापोटी संबंधित अट्टल गुन्हेगारांची पाठराखण केली आणि त्यांच्या या चामडी पान २ वर

## शनिवारी होणार श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या पालखी सोहळ्याचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान

**बीड। प्रतिनिधी**

**लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाचे प्रात:स्मरणीय श्री संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभिलेल्या ओम चैतन्य गहीनाथ व श्री संत वामनभाऊ महाराज पादुका पालखी सोहळा श्री क्षेत्र पंढरपूरकडे येत्या शनिवार दिनांक ६ जुलै २०२४ रोजी दुपारी दोन वाजता मार्गस्थ होणार आहे या सोहळ्यासाठी तमाम भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन क्षेत्र गहिनीनाथ गडाचे विश्वस्त यांनी केले आहे.**

सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत ह भ प गुरुवर्य विठ्ठल महाराज यांच्या नेतृत्वाखाली हा पादुका पालखी सोहळा शनिवार दिनांक ६ जुलै रोजी सकाळी दहा वाजता ओम चैतन्य नवनाथ व सद्गुरु वामनभाऊ महाराज





यांचा समाधीपूजन सोहळा होऊन दुपारी दोन ते चार वाजता हा पालखी सोहळा श्री क्षेत्र पंढरपूर कडे रवाना होत आहे सकाळी व दुपारी भोजनाचा कार्यक्रम सांगळे या बंधूंचा होणार आहे. रात्री येथून जवळच असलेल्या निवडुंगा येथे मुक्काम होणार आहे. सात जुलै वाहली. केकान वस्ती. सावरगाव. वनवेवाडी. पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३ जुलै २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १८.०० क्विंटल | २,२७० | २,३६१ | २,३१० |
| ज्वारी/हायब्रिड : २०.०० क्विंटल | २,०८० | २,८०० | २,२८८ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : २.०० क्विंटल | १०,७०० | १०,९०० | १०,७८७ |
| उडीद :०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| बाजरी: ७.५० क्विंटल | २,३९० | २,७७० | २,५५० |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ७३.५० क्विंटल | ४,५१४ | ४,५१५ | ४,५१४ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ४,७०० | ६,३०० | ५,५०० |

# पंकजा मुंडेंची संपत्ती पाच वर्षात १० कोटीने वाढली

## विधान परिषदेचा अर्ज भरताना प्रतिज्ञापत्रात उल्लेख

**मुंबई। प्रतिनिधी**

**विधानपरिषदेच्या निवडणूक उमेदवारीची यादी जाहीर झाली आहे. प्रतिज्ञापत्रात पंकजा यांची संपत्ती गेल्या पाच वर्षात १० कोटी ६७ लाख रुपयांनी वाढलेली आहे. भाजपने विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी पंकजा मुंडेंना पक्षाकडून हिरवा कंदील दिला. त्यामुळे राजकीय वर्तुळात पंकजा यांच्या नावाची सध्या चर्चा होत आहे.**

विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी दिलेल्या प्रतिज्ञापत्रात पंकजा यांच्याकडे एकूण स्थूल मुल्य ६ कोटी ८ लाख १५ हजार रुपये आहे. पंकजा यांचे पती चारुदत्त



पालवे यांची एकूण स्थूल मालमत्ता १० कोटी, ४९ लाख ३४ हजार ८१३ रुपये इतकी आहे. पंकजा मुंडे यांच्याकडे २ लाख ८५ हजाराचे ४५० ग्रॅम सोने तर तीन लाख २८ हजार रुपयांची चार किलो चांदी असल्याचे सांगितले आहे. पंकजा यांनी लोकसभा निवडणुकीच्या वेळी जाहिर केलेल्या शपथपत्रातील माहितीनुसार, पंकजा आणि त्यांचे पती चारुदत्त पालवे यांच्यावर ९ कोटी ८४ लाखांचे कर्ज असल्याचे सांगितले गेले. पंकजा यांचे बँकेत कागदपत्रे आणि शेअर्स आणि सोन्याच्या दागिन्यांचा समावेश आहे. पंकजा यांच्याकडे ४५० ग्रॅम सोने असल्याची माहिती आहे. ज्याची किंमत ३ लाखाच्या जवळपास असल्याची माहिती आहे. त्याशिवाय चार किलो चांदीची त्यांनी पान २ वर

## ठाकरेंच्या राईट हॅन्डची बीडमध्ये जमीन

### मिलिंद नार्वेकरांच्या तिजोरीत संपत्ती किती?

मुंबई : मिलिंद नार्वेकर उद्धव ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू व्यक्ती म्हणून तीन दशकांपासून काम पाहत आहेत. विधान परिषदेसाठी शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार मिलिंद नार्वेकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. निवडणुकीचा अर्ज भरल्यानंतर नार्वेकर यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील त्यांच्या संपत्तीचा तपशील आता समोर आला



आहे. नार्वेकर यांच्या नावावर कोट्यवधीची संपत्ती तर नार्वेकरांच्या पत्नीच्या नावे ११ कोटी ७४ लांखांची संपत्ती आहे. मिलिंद नार्वेकर यांच्या स्वतःच्या नावावर कोणतेही वाहन नाही. तसेच उद्धव ठाकरे यांच्या स्वीय सहाय्यकावर एकही गुन्हा दाखल नाही. तसेच ठाकरेंच्या या राईट हॅन्डची बीड जिल्हयात जमीन आहे.

मिलिंद नार्वेकर यांच्याकडे रोख रक्कम पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# एनडीए सरकारला बेरोजगारीचे आव्हान पेलावेच लागेल!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नव्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारसमोर बेरोजगारी आणि रोजगाराची संधी निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे. अलिकडेच फ्रान्सच्या 'कॉर्पोरेट अँड इन्व्हेस्टमेंट बँक नेटिक्सि एसए' ने जारी केलेल्या अहवालात भारतात वेगाने तरुण रोजगारासाठी तयार होत असून ते नव्याने बेरोजगारीत सामील होत आहेत. त्यामुळे २०३० पर्यंत दरवर्षी सुमारे १.६५ कोटी नव्या रोजगाराची गरज भासणार आहे. यात सुमारे १.०४ कोटी नोक-या संघटित क्षेत्रात तयार कराव्या लागणार आहेत. त्याचवेळी मागच्या दशकांत वार्षिक १.२४ कोटी रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या होत्या. भारताला आपल्या अर्थव्यवस्थेचा वेग कायम ठेवण्यासाठी सेवा क्षेत्रापासून ते निर्मितीपर्यंतच्या सर्व क्षेत्रांना नव्या वेगाने चालना द्यावी लागणार आहे. आंतरराष्ट्रीय श्रम (कामगार) संघटनेनुसार २०२२ मध्ये भारतातील बेरोजगारीचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ८३ टक्के होते. जागतिक बँकेनुसार भारतात एकूण लोकसंख्येपैकी ५८ टक्के लोकांच्या हाताला काम असून हे प्रमाण आशिया खंडातील समकक्ष देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. त्यामुळे नव्या आघाडी सरकारला बेरोजगारीच्या चिंताजनक आकड्यांकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे. गेल्या दहा वर्षांत संघ लोकसेवा आयोगाची रेल्वे भरती आणि कर्मचारी निवड मंडळाने (एसएससी) केलेली भरती ही रिक्त जागांच्या तुलनेत खूपच कमी होती.

राष्ट्रीय सांख्यिकी संघटना (एनएसओ)ने जारी केलेल्या कामगार सर्वेक्षण (पीएलएफएस) च्या आकडेवारीनुसार भारताच्या शहरी भागात बेरोजगारीचा दर आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या चौथ्या तिमाहीत (जानेवारी ते मार्च) वाढत ६.७ टक्क्यांवर पोचला असून तो दर यापूर्वीच्या तिमाहीत ६.५ टक्के होता. शहरातील बेरोजगारीचा दर गेल्या चार तिमाहीच्या उच्च पातळीवर पोचला आहे. पंधरा वर्षांपेक्षा अधिक वयोगटातील बेरोजगारीचा दर हा जानेवारी ते मार्च २०२३ च्या तिमाहीतील ६.८ टक्क्यानंतरचा सर्वाधिक आहे. त्यामुळे नव्या एनडीए सरकारला देशाच्या नव्या पिढीसाठी 'जॉब सिकर'ला म्हणजे नोकरीची आस बाळगून असलेल्या लोकांसाठी वेगाने रणनीती आखावी लागेल आणि त्याची अंमलबजावणी करावी लागेल. गेल्या दहा वर्षांत नव्या पिढीकडून स्वयंरोजगाराच्या संधीला प्राधान्य दिले जात असताना त्याचा वेग वाढवावा लागेल. पंधरा वर्षांपेक्षा अधिक वयोगटातील बेरोजगारीचा दर हा जानेवारी ते मार्च २०२३ च्या तिमाहीतील ६.८ टक्क्यानंतरचा सर्वाधिक आहे. एका सर्वेक्षणानुसार देशात तरुण बेरोजगारीचा स्तर वाढत आहे आणि तो स्तर गेल्या तिमाहीतील १६.५ टक्क्यांवरून चौथ्या तिमाहीत १७ टक्के झाला आहे. हा आकडा महत्त्वाचा आहे. कारण या वयोगटातील तरुण पहिल्यांदाच रोजगाराच्या बाजारात प्रवेश करतात. त्यामुळे शहरी रोजगाराच्या बाजारातील घसरणीचे आकलन होते. आता नव्या सरकारकडून देशातील असंघटित क्षेत्र लघु आणि मध्यम उद्योग आणि गिग वर्कर्स (डिलिव्हरी बॉय या श्रेणीत मोडतात) च्या चिंतेकडे देखील लक्ष द्यावे लागेल. या क्षेत्रात कोट्यवधी लोकांना रोजगार मिळत आहे, मात्र त्यांचे भवितव्य असुरक्षित आहे. जून २०२२ मध्ये सादर केलेल्या नीति आयोगाच्या अहवालानुसार भारताचे ७७ लाख नागरिक सध्या गिग अर्थव्यवस्थेचा भाग आहेत. एका अंदाजानुसार २०२९-३० पर्यंत त्यांची संख्या २.३५ कोटी होईल. गिग वर्करर्सची सर्वांत मोठी समस्या नोकरी गमावण्याची आणि भविष्य निर्वाह निधी, आरोग्य विमा आणि सामाजिक सुरक्षा नसण्याची आहे. देशातील रोजगाराचे आकलन केल्यास महिलांची स्थिती देखील चांगली दिसत नाही. नॅसकॉमच्या मते, भारतात तंत्रज्ञान मनुष्यबळात केवळ ३६ टक्के महिला आहेत. जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार, भारतातील शास्त्रज्ञ, अभियंते आणि तंत्रज्ञांत महिलांचा सहभाग केवळ १४ टक्के आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, इंजिनीअरिंग आणि गणित (एसटीईएम) क्षेत्रात महिलांना रोजगाराची संधी कमी आहे आणि भारतात रोजगाराच्या संभाव्य मोठ्या संधीत महिलांचे प्रमाण कमी असणे देखील आव्हानात्मक आहे. त्यामुळे नव्या एनडीए सरकारला देशाच्या नव्या पिढीसाठी 'जॉब सिकर'ला म्हणजे नोकरीची आस बाळगून असलेल्या लोकांसाठी वेगाने रणनीती आखावी लागेल आणि त्याची अंमलबजावणी करावी लागेल. गेल्या दहा वर्षांत नव्या पिढीकडून स्वयंरोजगाराच्या संधीला प्राधान्य दिले जात असताना त्याचा वेग वाढवावा लागेल. 'स्कॉच'च्या एका अहवालात म्हटले, मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात ५१.४० कोटी लोकांना रोजगार मिळाला. याचे आकलन करण्यासाठी रोजगार आणि स्वयंरोजगाराशी संबंधित बारा केंद्रीय योजनांना सामील करण्यात आले होते. त्यात मनरेगा, पीएमजीएसवाय, पीएमईजीपी, पीएमए-जी, पीएलआय, पीएमएवाय-यू आणि पीएम स्वनिधी यासारख्या प्रमुख रोजगारांचा समावेश आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या दहा वर्षांत आर्टिफिशियल इंटिलिजिन्स (एआय) सारख्या नव्या तंत्रज्ञानाने सज्ञ झालेल्या नव्या पिढीसाठी रोजगाराच्या संधी वाढवल्या आहेत, यात कोणाचेही दुमत नाही. आता तिस-या कार्यकाळात देशात जागतिक क्षमता केंद्र (जीसीसी) स्थापना करण्याचा वेग वाढवावा लागेल आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणा-या तरुणांसाठी रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी वाटचाल करावी लागेल. अनेक विकसित आणि विकसनशील देशांत ज्येष्ठ नागरिकांची वाढत असताना स्थानिक पातळीवर उद्योग, व्यवसाय अणि सेवा क्षेत्रातील कामासाठी तरुणांची संख्या मात्र कमी झाली आहे आणि परिणामी या देशांत कुशल कामगारांची टंचाई निर्माण झाल्याने कंपन्यांना जादा पैसे मोजावे लागत आहेत. परिणामी संबंधित देशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशावेळी भारताने या संधीचा लाभ उचलला पाहिजे आणि त्यानुसार पावले टाकावी लागतील. मागील काळात भारत सरकारने जगभरात कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासंदर्भात विविध देशांशी करारावर स्वाक्ष-या केल्या होत्या. आता नव्या सरकारला अशाच कराराला पुढे चाल द्यावी लागेल आणि नवे सर्वसमावेशक धोरण आखावे लागेल.

# विमा कंपन्यांना ७० लाखाचा गंडा

**ठाणे । प्रतिनिधी**

एकाच व्यक्तीचे दोन वेगवेगळे मृत्यू दाखले तयार करून विमा कंपनीची फसवणूक करत मिरा भाईंदरमध्ये ७० लाखांचा गंडा घातल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी भाईंदर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात अद्याप एकालाही अटक करण्यात आली नसून चार जणांचा शोध सुरु आहे. आरोपींमध्ये एका डॉक्टराचाही समावेश आहे.

भाईंदर पश्चिमेच्या प्रभातनगर, राई गाव येथे राहणा-या कांचन ऊर्फ पवित्रा रोहीत पै, रोहित पै, धनराज पै आणि डॉ. आशुतोष यादव यांनी मिळून बनावट कागदपत्रे तयार केली. आरोपी त्या कागदपत्रांच्या आधारे इन्शुरन्स कंपन्यांकडून क्लेम मिळवायचे, टर्म इन्शुरन्स काढायचे आणि त्यानंतर मयत दाखवून त्याचे बनावट कागदपत्रे बनवून इन्शुरन्स कंपनीला सादर करायचे. इन्शुरन्स क्लेम मिळाल्यानंतर ते घर सोडून दुसरीकडे रहायला जायचे. तेथे रहायला गेल्यानंतर त्या पत्त्यावर पुन्हा त्याच व्यक्तीचा टर्म इन्शुरन्स काढायचे. अशा प्रकारे आरोपींनी आयसीआयसीआय, मॅक्स लाईफ, भारती एक्सा, फ्युचर जनरल, एचडीएफसी इन्शुरंस अशा सहा इन्शुरन्स कंपन्याच्या पॉलिसी काढल्या होत्या. त्यातील चार कंपन्यांकडून १,१०,५८,७५० रुपयांचा क्लेम केला. क्लेम केल्यानंतर त्या रकमेपैकी ६९ लाख ६० हजार रुपयांची क्लेमची रक्कम मिळवली.

# महिलांच्या सन्मानासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना-आशाताई ढाकणे

**केज । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये '' मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना '' घोषित केलेली आहे यामध्ये रुपये १५००/ महिलांच्या खात्यामध्ये जमा होणार आहेत ही योजना १ जुलै पासून चालू होणार आहे सदर योजना महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत राबवल्या जाणार आहे अशी माहिती सामाजिक कार्यकर्त्या सौ आशाताई बाजीराव ढाकणे यांनी दिली आहे. या योजनेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे.**

२१ ते ६० वर्ष वयोगटातील विवाहित, परितकत्या, विधवा, महिला, त्या महाराष्ट्रातील रहिवासी असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचे रू २.५० लाखापेक्षा जास्त नसावे म्हणजे कुटुंब प्रमुखाचे उत्पन्न अडीच लाखापर्यंत असावे, बँकेमध्ये सदर महिलेच्या नावे खाते असावी , रेशन कार्ड मध्ये सदर महिलेचे नाव असावे सदर योजना अंतर्गत सोमवार पासुन सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी '' नारी शक्ती दुत ॲप '' प्ले स्टोअर वरून आपल्याला देण्यात आलेल्या मोबाईल मध्ये डाऊनलोड करून घ्यावयाचे आहे व आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पात्र महिलांची नोंदणी महत्वाचे_सर्वात पहिले अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी आपली नोंदणी या योजनेअंतर्गत पुढील आठवड्यात सोमवार ते बुधवार पर्यंत १००% करून घेण्याचे उद्दिष्ट देण्यात



आलेले आहे. सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची नोंदणी सदर ''नारी शक्ती दुत ॲप'' मध्ये करून घेण्याची जबाबदारी अंगणवाडी पर्यवेक्षिका यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे नोंदणी करत असताना, उत्पन्नाचा दाखला सण २०२५ पर्यंत वैद्य असणारा असावा, जन्माचा दाखला असावा / टि.सी झेरॉक्स असावी , रेशन कार्ड ची झेरॉक्स असावी, आधार कार्ड, लाभार्थी नावाने बॅक पासबुक झेरॉक्स सर्व माहिती ॲप मध्ये अंगणवाडी सेविका यांनी भरावयाची आहे सोबत आधार कार्ड असणे आवश्यक आहे या व्यतिरिक्त अंगणवाडी सेविकेला गावातील इतर पात्र असणाऱ्या २१ ते ६० वयोगटातील महिलांना सुद्धा आवश्यक कागदपत्र तयार करून गावातील सेतू केंद्रातून किंवा ग्रामसेवकांच्या माध्यमातून सदर योजने करता अर्ज किंवा माहिती भरणे बाबत जनजागृती अंगणवाडी केंद्रामध्ये माता सभा घेऊन उद्या पासून करावी तसेच १ ते १५ जुलै २०२४ या कालावधी गावातील कोणतीही २१ ते ६० वयोगटातील पात्र असणारी महिला ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'' पासुन वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी घ्यावी गावातील जेवढे ग्रुप असतील त्या सर्व ग्रुपमध्ये या योजनेबाबत माहिती टाकावी काही आवश्यकता असल्यास त्यांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच संबंधित बीटच्या पर्यवेक्षिका यांचे मोबाईल नंबर देण्यात यावेत असे श्री तुळजाभवानी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जोला पो देवगाव ता केज जि बीड च्या सचिव तथा सामाजिक कार्यकर्त्या सौ आशाताई बाजीराव ढाकणे यांनी सांगितले आहे

# नीट-यूजी फेरपरीक्षेत टॉपर्स घटले!

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**नीट-यूजी परीक्षेचा सुधारित निकाल नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) जाहीर केला. ज्या विद्यार्थ्यांना ग्रेस गुण देण्यात आले होते त्यांची सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २३ जून रोजी फेरपरीक्षा घेण्यात आल्यानंतर आता नवी गुणवत्ता यादीही जाहीर झाली. जुन्या गुणवत्ता यादीत ६७ टॉपर होते, त्यांची संख्या नव्या गुणवत्ता यादीत ६१ पर्यंत खाली घसरली आहे. फेरपरीक्षेसाठी १,५६३ उमेदवारांपैकी ८१३ जण म्हणजे ५२ टक्के लोक उपस्थित व ४८ टक्के जण अनुपस्थित होते.**

चंडीगड केंद्रावर दोन विद्यार्थी फेरपरीक्षा देणार होते, पण ते गैरहजर राहिले. झज्जर येथील परीक्षा केंद्रांवर ४९४ पैकी २८७ विद्यार्थ्यांनी म्हणजे ५८ टक्के जणांनी फेरपरीक्षा दिली होती. हरयाणा केंद्रातील सहा विद्यार्थ्यांनी ग्रेस गुणांच्या बळावर १०० टक्के गुण मिळविले होते, असा आरोप झाला होता. या परीक्षेत दिलेले ग्रेस गुण रद्द करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर फेरपरीक्षेचा पर्याय उपलब्ध करून दिला. नीट-यूजी परीक्षेत ६७ जणांनी ७२० म्हणजे पैकीच्या पैकी गुण मिळविले होते. मात्र फेरपरीक्षेतील एकाही विद्यार्थ्याला १०० टक्के गुण मिळालेले नाहीत. समुपदेशन ६ जुलैपासून : नीट-यूजीमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या समुपदेशाची प्रक्रिया येत्या ६ जुलैपासून सुरू होणार आहे.

# ३२८ कोटींच्या ड्रग्सचे रॅकेट सापडले; १५ आरोपींना अटक

**मिरा रोड । वृत्तसंस्था**

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या क्राईम युनिट १ ने अंडरवर्ल्डशी संबंध असलेल्या मोठ्या ड्रग्स रॅकेटचा भांडाफोड करण्यात यश आले आहे. याप्रकरणी महाराष्ट्रातून ३, तेलंगणातून ३, उत्तर प्रदेशातून ८ आणि गुजरातहून १ असे १५ आरोपींना अटक करण्यात यश मिळवले आहे. त्यांच्याकडून ३२८ कोटीचे एम.डी. (मेफेड्रॉन) अंमली पदार्थ, कच्चे एम.डी. आणि एम.डी. बनवण्यासाठी लागणारे केमिकल्स, साहित्यासोबतच ३ पिस्टल, १ रिवॉल्वर आणि ३३ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आले. आज पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी याबाबत पत्रकार परिषदेत माहिती दिली.

क्राईम युनिट १ ने द्वारका हॉटेल येथे आरोपी शोएब हनीफ मेमन आणि निकोलस लिओफ्रेड टायटस यांना पकडले असता त्यांच्याजवळून २ कोटी किंमतीचे एम.डी. ड्रग्स मिळून आले. आरोपी शोएबने दिलेल्या माहितीनुसार आरोपी दयानंद उर्फ दया माणिक मुद्दनार आणि नासीर उर्फ बाबा जानेमियॉ शेख यांना हैद्राबाद येथून या दोघांना अटक केली. यातील दयानंद उर्फ दया याची नरसापुर जिल्हा विकाराबाद तेलंगणा येथे एम.डी. बनविण्याची फॅक्टरी आढळली. आरोपी दयाने दिलेल्या माहितीनुसार घनश्याम रामराज सरोज याला वाराणसी येथून ताब्यात घेतले. त्याचबरोबर मोहम्मद शकील मोहम्मद मोईन तेलंगणात राहणा-याला मुंबईच्या गोरेगाव येथून त्याच्या स्विफ्ट कारसह ताब्यात घेतले. पोलिसांना त्यानंतर ही तपासामध्ये एम.डी. बनवण्यासाठी लागणारे पैसे व एम.डी. विकून मिळालेले पैसे याची देवाण-घेवाण करणारा दाउदचा मुख्य हस्तक सलीम डोळा याची लिंक लागली. तोच धागा पकडत गुजरातच्या सुरत येथे राहणारा आरोपी झुल्फीकार उर्फ मुर्तुझा मोहसीन कोठारी याच्याकडे पाठविलेली १० लाख ८४ हजार रोख रक्कम जप्त केली. उत्तर प्रदेशाच्या आजमगड येथून आरोपी सलीम डोळा आणि दया याचे साथीदार आरोपी अमिर तौफीक खान, त्याचा भाऊ बाबू तौफीक खान याचे साथिदार मोहम्मद नदीम शफिक खान, एहमद शाह फैसल शफीक आझमी यांना अटक करुन त्यांच्याकडून ३०० कोटीकिंमतीचे १२ कच्चे एम.डी. चे ड्रम जप्त केले. याच गुन्हयातील अमिर तोफीक खान, मोहम्मद शादाब मोहम्मद शमशाद खान आणि अलोक विरेंद्र सिंह यांना उत्तर प्रदेशातील लखनउ येथून अटक केली. यातील आरोपी अमिर खान याने दिलेल्या माहितीनुसार उत्तर प्रदेश येथे राहणार अभिषेक उर्फ शुभम नरेंद्रप्रताप सिंह याला नालासोपारा येथून अटक केली.

## पान १वरून...

### महिला मजुर मिळेना, शेतकऱ्यांची

आवश्यक कागदपत्रे द्यावी लागतात. ही कागदपत्रे जमा करण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांची तलाठी आणि तहसीलदार कार्यालय परिसरात मोठी गर्दी झाली आहे. एन पेरणीच्या दिवसात शेतमजूर महिला या शेती काम सोडून कागद पत्र गोळा करण्यात व्यस्त झाल्याने शेतकऱ्यांचा शेतात पेरणी, निंडणी,आणि खत देण्याच्या साठी शेत मजूर महिला मिळेनाशा झाल्या आहेत. शेतीची कामे रखडली गेल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

----------

### पोर्टल अपडेट नाही, नोटिफिकेशन

असा प्रश्न लाभार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेची घोषणा सरकारकडून करण्यात आली. यानंतर अवघ्या काही तासातच महिलांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी सेतू, तहसील कार्यालयात एकच झुंबड केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा लाभ मिळावा यासाठी अर्ज करण्याची मुदत १ जुलै ते १५ जुलै पर्यंत ठेवण्यात आली होती. मात्र यामध्ये मुदतवाढ देण्यात आली असून आता ३१ ऑगस्ट ही आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेची घोषणा सरकारकडून करण्यात आली. यानंतर अवघ्या काही तासातच महिलांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करण्यासाठी सेतू, तहसील कार्यालयात एकच झुंबड केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा लाभ मिळावा यासाठी अर्ज करण्याची मुदत १ जुलै ते १५ जुलै पर्यंत ठेवण्यात आली होती. मात्र यामध्ये मुदतवाढ देण्यात आली असून आता ३१ ऑगस्ट पर्यंत लाभार्थी महिलांना अर्ज करता येणार आहे. तर ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज करण्यात आलेल्या लाभार्थी महिलांना ०१ जुलैपासून दर माह १५०० रूपये आर्थिक लाभ मिळणार आहे. सरकारने ही घोषणा केली मात्र लाडकी बहीण योजनेचे पोर्टल अद्याप सुरूच झाले नसल्याचे समोर आले आहे. १ तारखेला पोर्टल सुरू होणं अपेक्षित असताना पोर्टल अद्याप बंदच आहे. त्यामुळे सेतू कार्यालयात सध्या ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. तर ऑफलाईन प्रक्रियेनंतर ऑनलाईन प्रक्रिया पुन्हा करावी लागणार असल्याने सेतू कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा ताण वाढणार आहे.

-----------------

### लाडकी बहीण' योजनेसाठी अडवणूक,

तसेच दलालांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. योजनेसाठी नावनोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. योजनेच्या लाभासाठी पात्र महिलांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन देणे तसेच त्यानंतर योजनेचा फॉर्म भरणे इत्यादी संपूर्ण प्रक्रियेसंदर्भात काल विधानभवन येथे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा करुन योजनेची अंमलबजावणी पारदर्शक आणि जलदगतीने होईल यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. माता-भगिनींचे आयुष्य बदलवून टाकणाऱ्या विविध योजना राज्य शासनाने आणल्या आहेत. मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा शासन निर्णयही लगेचच काढण्यात आला. या योजनेतील पात्र महिलांना महिन्याला दीड हजार रुपये म्हणजे वर्षाला १८ हजार रुपये राज्य सरकार देणार आहे. यासाठी ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना म्हणजे माता-भगिनींना माहेरचा आहेर आहे. नोंदणीसाठी रांगा लावण्याची गरज पडणार नाही, यादृष्टीने चोख नियोजन करावे, लाडक्या बहिणींची कोणत्याही कारणास्तव अडवणूक होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, अशा सक्त सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

------------

### आम्ही लाडक्या भावांचाही

चर्चा राज्यभरात होत आहे. मात्र, शिवसेना पक्षप्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या योजनेचं स्वागत करताना सत्ताधाऱ्यांना टोमणाही मारला होता. लाडक्या बहिणींसाठी योजना आली, त्याचे स्वागत पण लाडक्या भावांसाठीही योजना आणावी, असे उद्धव ठाकरेंनी म्हटले होते. त्यावरुन, आता मुख्यमंत्री शिंदेंनी टोला लगावला आहे. काही लोकं म्हणाले लाडक्या बहिणीचे झाले, लाडक्या भावांचे काय?, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी नाव न घेता उद्धव ठाकरेंना टोला लगावला. ज्यांना सख्खे भाऊ नाही समजले, त्यांना लाडकी बहिण योजना कशी काय कळायची, असा जोरदार पलटवार एकनाथ शिंदेंनी ठाकरेंवर केला. तसेच, आम्ही तेही केले आहे. लाडक्या भावांचा देखील आम्ही निर्णय घेतला आहे. राज्यातील १० लाख मुलांना अप्रेंटीशीप आम्ही देतोय, १० हजार ते ८ हजार रुपये दरमहा या तरुणांना मिळणार आहेत. त्याची अंमलबजावणी तत्काळ होण्यासाठीची व्यवस्था देखील आम्ही करत आहोत, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**फोटोग्राफर्स म्हणत ठाकरेंना टोला**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेमुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, योजना मिळवण्यासाठी महिलांची गर्दी होत आहे. या गर्दीचे फोटो काढले पाहिजेत, खरंतर या सभागृहात काही चांगले फोटोग्राफर्सही आहेत. त्यांनी रियल फोटोग्राफी सोडून जमिनीवरचेही फोटो काढले पाहिजेत, ही गर्दी पाहून त्यांचे चेहरेही फोटो काढावेत असेच होतील, असे म्हणत मुख्यमंत्री शिंदेंनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.

-----------

### सर्व विद्यार्थ्यांना मोफत

मोठा विस्तार राज्यसरकारने केला आहे. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील कृषीपंपाना यापुढे वीज बील माफ करण्यात येत आहे. राज्यात ४७ लाख कृषीपंप आहेत. त्यापैकी ४३ लाख कृषीपंपांचा वीज बील माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. पाण्याचे नियोजन व्यवस्थित व्हावे यासाठी काही ठिकाणी वीज बील माफ करण्यात आलेले नाही. आमचे असे मत नाही की, आम्ही सर्वांत हुशार आहोत. आम्हालाच सर्व समजते. आमच्या हातूनही चुका होऊ शकतात. विरोधी पक्षांनी राजकारण न करता चूक सांगितली तर त्या चूकाही आम्ही दुरुस्ती करणार आहोत, असेही देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.

-------------

### शनिवारी होणार श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या

मातकोळी डोंगर. व रात्री मतकुळी मैदान. या ठिकाणी मुक्काम होणार आहे आठ जुलै रोजी जवरे वस्ती. जामदार वाडी. जामखेड. जगदाळे वस्ती. जामदारवाडी सारोळा. येथे मुक्काम नऊ जुलै रोजी सारोळा वस्ती. खुर्द. घोडेगाव आपटी. पिंपळगाव वस्ती. पिंपळगाव उंडा. येथे मुक्काम दहा जुलै रोजी पिंपळगाव वस्ती. जवळके सटवायचे. जाधव वस्ती. मशिदीचे कोठे. पांढरेवाडी. तांदळवाडी. येथे मुक्काम ११ जुलै रोजी देऊळगाव. डोणजे कसाबचे. बंगालवाडी. मिरगव्हाण. मुक्काम १२ जुलै रोजी शेळके वस्ती. नागोबाचे हिवरे. सालसे. आळसुंदे वस्ती. वरकुटे मूर्तीचे. मुक्काम १३ जुलै रोजी मूर्तीचे वरकुटे. रोपळे. रिंगण १८ भोगेवाडी. वस्ती. भोगेवाडी मुक्काम. १४ जुलै रोजी ढवळस पिंपळखुंटे. अंबड. शिराळाचे कोठे .भेट सावता माळी चे आरण मुक्काम १५ जुलै रोजी बार्डी. जाधववाडी. मेंढापूर. पादुका रिंगण व आमदार धोंडे यांची भोजन राहील व रात्री श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मुक्काम होईल १६ जुलै रोजी महाराष्ट्राचे माजी मंत्री सुरेश आण्णा धस यांची महाप्रसादाची पंगत होईल असा हा सर्व कार्यक्रम होणार आहे तेव्हा इच्छुक भाविक भक्तांनी या पायी सोहळ्यासाठी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड व पंचक्रोशीतील हजारांच्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहनही करण्यात आले आहे सोबत येताना अंतरायची पांगरायची वळकटी आपापल्या आजारावरील गोळ्या औषधे बॅटरी अधिवस्तू सोबत आणाव्यात जेणेकरून या सर्वांचा उपयोग आपल्यासाठीच होणार आहे

-------------

### आ.रोहित पवार यांच्या असंवेदनशील

बचाव धोरणाचा संबंध परळीकरांच्या वतीने निषेध व्यक्त करत आज दिनांक ३ जुलै रोजी परळी शहर कडकडीत बंद पाळण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सरपंच बापू आंधळे हत्या प्रकरणातील प्रमुख आरोपींना अटक करण्यात यावे तसेच आमदार रोहित पवार यांच्यासारख्या बाष्कळ वाचाळ वीरांना आवर घालण्यात यावी, अशी मागणी या आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली व आज अत्यंत शांततापूर्ण मार्गाने सबंध परळीतील व्यापार पेठ बंद ठेवून सर्वच परळीवासियांनी मयत सरपंच बापू आंधळे यांच्या मारेकऱ्यांना अटक करण्याची एक मुखाने मागणी केली. दरम्यान मयत बापू आंधळे हे मरळवाडी गावचे युवा सरपंच होते. डोक्यात गोळ्या झाडून अत्यंत वाईट पद्धतीने व अत्यंत निर्घृण पणे त्यांची हत्या करण्यात आली. मात्र पोलिसांना अद्याप मारेकऱ्यांचा तपास लागला नाही, पोलिसांनी मारेकऱ्यांना तातडीने अटक करून बापू आंधळे कुटुंब व अन्य पीडितांना न्याय मिळवून द्यावा, अशी एकमुखी मागणी समस्त परळी वासीयांची आजच्या आंदोलनात दिसून आली.

----------

### अब्दुल हाफिज

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मंजूर केला आहे. त्यामुळे प्रज्ञा सातव यांना पुन्हा एकदा काँग्रेसकडून आमदारकीची संधी मिळाली आहे. प्रज्ञा सातव या काँग्रेसचे दिवंगत माजी खासदार राजीव सातव यांच्या पत्नी आहेत. मात्र, त्यांच्या उमेदवारीवरुन काँग्रेस पक्षातील नाराजी समोर आली आहे. या उमेदवारीवरुन महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अब्दुल हाफिज यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

-----------

### पंकजा मुंडेंची संपत्ती पाच

गुंतवणूक केलेली आहे. पंकजा यांनी दागिन्यांमध्ये केलेली गुंतवणूक सुमारे ३२ लाखांच्या जवळपास असल्याचे सांगितले गेले.

--------------

### ठाकरेंच्या राईट हॅन्डची बीडमध्ये जमीन

४५ हजार रुपये तर पत्नीकडे ३६ हजार रुपये रोख रक्कम आहे. नार्वेकर यांच्या बँक अकाउंटमध्ये ७४ लाख १३ हजार २४३ रक्कम तर पत्नीकडे ८ कोटी २२ लाख ११८ एवढी रक्कम आहे. नार्वेकर यांच्या आर्थिक गुंतवणुकीमध्ये विविध बँकांमधील ठेवी आणि शेअर्समधील गुंतवणुकीचा समावेश आहे. बॉण्ड्स किंवा म्युचल फंडमध्ये ५० हजार, तर पत्नीची १२ कोटी ४० लाख ८२ हजार ५२६ रुपये गुंतवणूक आहे. पोस्ट ऑफिस अथवा इतर पॉलिसीमध्ये ३ लाख ६८ हजार ७२९ रुपये तर पत्नीची ६७ लाख ८८ हजार ५५८ गुंतवणूक आहे.

**नार्वेकरांकडे दागिने किती?**

स्वत: नार्वेकरांकडे एकूण ७१ लाख २८ हजार १८९ रुपयांचे दागिने आहेत. सोनं - ३५५.९४ ग्राम, बाजारी भाव - २४ लाख ६७ हजार ९८१ चांदी - १२.५६ किलोग्राम, बाजारी भाव - ९ लाख ७४ हजार ६५६ हिरे - ८०.९३, बाजारी भाव - ३६ लाख ८५ हजार ५५२ नार्वेकरांच्या पत्नीकडील दागिने नार्वेकरांच्या पत्नीकडे ६७ लाख ६१ हजार ४२० रुपयांचे दागिने आहेत. सोनं - ४२५ ग्राम, २९ लाख २६ हजार २१ रुपये चांदी - ६.२६ किलो, ४ लाख ८५ हजार ७७६ हिरे - ९०.९६, ३३ लाख ४९ हजार ६२३ जमीन-१६ जुलै २०१३ रोजी गांव मुरुड तालुका दापोली जिल्हा रत्नागिरी येथे ७४.८० एकर जमीन यामध्ये पत्नीचा ५० टक्के हिस्सा शेतजमीन - ५ ऑगस्ट २००८ रोजी खरेदी केलेली बीड जिल्ह्यातील बाणेवाडी गावात ०.१९ एकर जमीन, बेंगलोर येथे पत्नीच्या नावावर २३२५ स्क्वेअर फुट जमीन संपत्ती -मुंबईतील मालाड आणि बोरिवली येथे १००० स्क्वेअर फुटाचे घर नावावर, पत्नीच्या नावावर अलिबाग येथे एक फार्म हाऊस नावावर आहे. स्वतःच्या मालमत्तेची एकूण रक्कम - ४ कोटी १७ लाख ६३, हजार ३२३, पत्नीच्या मालमत्तेची रक्कम - ११ कोटी ७४ लाख ६ हजार ४९० रुपये आहे.

---------------

**टी.सी.हरवला आहे**

वेदांत शंकर इगडे या नावाचा १० दहावी पासचा टी.सी. बीड ते सोलापूर प्रवासामध्ये हरवला आहे. ज्या कोणाला सापडल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा.

----::::संपर्क::::----

मो.९५६१५११४७१

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. ०४ जुलै २०२४



## नामदेव दादा,मोतीराम दादांनी नव्या कवी, साहित्यिकांच्या अंकुराची जोपासना केली –सय्यद अल्लाउद्दीन

आष्टी : बीड जिल्ह्याला आद्यकवी,आद्य कवयित्रींची आणि अनेक संत कवींची परंपरा लाभलेली आहे.तसेच समृद्ध पत्रकारितेची परंपरा सुद्धा लाभलेली आहे.दै.चंपावतीपत्र,दै.झुंजार नेता या दैनिक वृत्तपत्रांनी वयाची साठी गाठलेली आहे.ग्रामीण भागातील लेखक,कवी,कथाकार,समीक्षक,विचारवंत यांना नामदेव क्षीरसागर दादा,मोतीराम वरपे दादा यांनी,त्यांना नुसते व्यासपीठ निर्माण करून दिले नाही तर,त्यांच्या नव्या नव्या अंकुराची जोपासना केली.त्यांना बळ दिले.असे कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन यांनी या शब्दात भावना व्यक्त केली.ते पुढे म्हणाले, दै.चंपावतीपत्र चे संपादक नामदेव क्षीरसागर दादा वयाच्या ८३ व्या वर्षी आपल्यातून निघून गेले.दै.चंपावतीपत्राच्या माध्यमातून जवळजवळ साठ वर्षाचा इतिहास ज्यांनी निर्माण केला.आज त्यांचं असं अचानक जाणं,दु:ख सागरात बुडवणार आहे.नामदेव क्षीरसागर दादा आणि मोतीराम वरपे दादा यांच्यामुळे माझ्या आधीपासून या क्षणापर्यंत साहित्यिक,कवींची जी पिढी उभी राहिली,त्यांच्यासाठी दु:खाचा डोंगर कोसळल्यासारखेच आहे.त्यांनी पाठीवर शाब्बासकीची थाप मारली म्हणून आम्ही लिहिते झालो.नाहीतर आमची कलम कधीच अबोल झाली असती.त्यांचे प्रोत्साहन,त्यांची प्रेरणा लेखणीला बळ घेत गेली.आज ते आमच्यात नाहीत ही कल्पनाच मनावर कायमचा आघात करणारीआहे.असेही कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन हे संपादक नामदेव क्षीरसागर दादा यांना श्रद्धांजली अर्पण करताना म्हणाले.

# रेशनचा तांदूळ विदर्भातून बीडला आणणे आता झाले बंद

## वाहातुकीचे महिन्याला पन्नास लाख रुपये वाचणार

**बीड । प्रतिनिधी**

रेशनचा तांदूळ भारतीय अन्न महामंडळाच्या जवळच्या गोदामातून आणण्याचा नियम आहे. मात्र या नियमाला बगल देत देत जिल्हाधिकारी कार्यालय परळी अथवा नगर येथून माल आणण्याचे ऐवजी थेट भंडारा किंवा गोंदियातून तांदूळ आणत होते. यावर हरकत घेऊन नुकसान भरपाई जिल्हाधिकाऱ्यांच्या वेतनातून का वसूल करू नये ? या मागणीचे निवेदन देताच शासनाच्या प्रधान सचिवांनी बीड जिल्हा आता गोंदिया किंवा भंडारा येथून सि.एम.आर. आणणार नाही, हे स्पष्ट करत नवा शासन आदेश जाहीर केला आहे. जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांच्या मागणीची तात्काळ दखल घेण्यात आली आहे.

विदर्भात होणाऱ्या धान खरेदीतील तांदूळ बीड जिल्ह्यातून वाहने पाठवून आणला जात होता. पुरवठा विभाग वाहतुकीचा अतिरिक्त खर्च करत आहे. जवळच्या गोदामातून माल आणण्या ऐवजी लांबून माल आणला जात असल्याने दर महिन्याला पन्नास लाखापेक्षा जास्त खर्च वाढत असल्याचे सांगत दोशींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती.

याच निवेदनामध्ये राज्याच्या पुरवठा मंत्र्यांवर आपला विश्वास नाही. त्यामुळे पुरवठा खात्याच्या प्रधान सचिवांनी आणि राज्याच्या मुख्य सचिवांनी यावर निर्णय घ्यावा, असे देशमुख यांनी म्हटल्यानंतर राज्याच्या मुख्य सचिवांनी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिवांना याबाबत तात्काळ निर्णय घेण्याचे सांगितले होते.प्रधान सचिवांनी नुकताच एक आदेश जारी करत पणन हंगाम २०२३-२४ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या धानापासून प्राप्त सीएमआर सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे अंतर्गत वाटप करण्यासाठी जवळपास दहा जिल्ह्यांना आदेश निर्गमित केले. मात्र बीड जिल्हा या आदेशातून वगळला आहे. त्यामुळे आता बीडला माल परळी अथवा नगर येथून येणार आहे.

यावर आणखी देखील पुरवठा विभागात हालचाली चालू असून पुन्हा भंडारा अथवा गोंदियातून माल आणण्यासाठी काहीजण उत्सुक असल्याचे दिसते. त्यामुळे जिल्हा पुरवठा अधिकारी आणि जिल्हाधिकारी या दोघांनी या तात्काळ लक्ष घालून शासनाला तसे कळवावे. जर चुकीची मागणी केली गेली तर संबंधिताच्या वेतनातून वसुली करण्याची मागणी आम्हाला करावी लागेल, असा इशारा देखील देशमुख यांनी दिला आहे.

दरम्यान पुरवठा विभागामध्ये आपण बरेच बदल केले असून प्रत्येक बाबीकडे लक्ष ठेवण्यासाठी खरी जबाबदारी प्रशासनाची असताना आम्हाला तिथे लक्ष घालावे लागते. चुका दुरुस्त करून घ्यावे लागतात. त्यामुळे आता जर चूक केली तर त्याचे गंभीर परिणाम प्रशासनाला भोगावे लागतील, असे देशमुख यांनी म्हटले आहे.

## पंकजाताईंची उमेदवारी जाहिर होताच नगराध्यक्षांकडून १५१ तोफांची सलामी




**पाटोदा । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीला राज्यात बहुमत मिळवण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना डावलून बहुमत मिळवणे अशक्य हि बाब लक्षात घेता भारतीय जनता पार्टी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी पंकजाताई मुंडे यांचे विधान परिषदेवर पुनर्वसन करून मुंडे घराण्याला परत एकदा प्रतिनिधित्व देऊन भारतीय जनता पार्टीने सन्मान करत पंकजाताई मुंडे यांची विधानपरिषदेवर उमेदवारी जाहिर करताच पाटोदा नगरपंचायत समोर १५१ तोफाची सलामी देऊन आनंद उत्सव साजरा करताना नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव, ,प्राध्यापक लक्ष्मण वाघमारे, जितेंद्र सांगळे यांच्या सह भाजपा कार्यकर्ते मोठ्या उपस्थित राहून जल्लोष साजरा केला.

## कोपरा येथे वसंतराव नाईक जयंती निमित्त कृषी दिन उत्साहात साजरा

अंबाजोगाई प्रतिनिधी

डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंती निमित्त १७ जून ते १ जुलै या कालावधीत कृषी विभागामार्फत 'कृषि संजीवनी पंधरवाडा' मोहीम राबवून कृषी विषयक प्रात्यक्षिक, तंत्रज्ञानाची तसेच खरीप हंगामातील पिकांच्या व्यवस्थापनाची माहिती देण्यात आली. पंधरवड्याच्या शेवटच्या दिवशी दि.१ जुलै रोजी वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त तालुका कृषी अधिकारी सुरेश ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरा येथे कृषी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमांमध्ये कृषी विज्ञान केंद्र अंबाजोगाईच्या आहार तज्ञ श्रीमती रोहिणी भरड यांनी तृणधान्याचे आहारामधील महत्व विस्तृतपणे समजावून सांगून तृणधान्य लागवड करण्याचे आवाहन केले त्याचप्रमाणे बचत गटाच्या महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून एकत्र येऊन स्वतःचा उद्योग उभारण्याबाबत विस्तृतपणे मार्गदर्शन केले. मंडळ कृषी अधिकारी श्री विजयकुमार पवार यांनी पी एम एफ एम ई योजने मध्ये असलेले विविध उद्योग व त्यासाठी असलेले अनुदान संदर्भात विस्तृतपणे माहिती दिली. कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी सद्यस्थितीत सोयाबीन पिकाचे कीड रोग अन्नद्रव्य व्यवस्थापन संदर्भात माहिती दिली यावेळी बचत गटाचे तालुका समन्वयक श्री कराड मुख्याध्यापक श्री कदम तसेच शेतकरी व बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.




## डॉ. सॅम्युएल हॅनेमन यांना एसकेएच महाविद्यालयामध्ये आदरांजली अर्पण

बीड । प्रतिनिधी

येथील सोनाजीराव क्षीरसागर वैद्यकीय महाविद्यालयामध्ये होमियोपँथीचे जनक डॉ सँम्युअल हैनिमन यांच्या १८१ व्या पुण्यतिथि निमीत्त महाविद्यालयाचे सल्लागार डॉ अरुण भस्मे यांच्या मार्गदर्शनाखाली होमिओपॅथी वैद्यक शास्त्राचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनेमन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल, उपप्राचार्य तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. गणेश पांगारकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. गणेश पांगरकर यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावित करतांना डॉ. सॅम्युएल हॅनेमन यांच्या जीवन कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल यांनी होमियोपँथीच्या जन्माच्या वेळी असणारी सामाजिक, आर्थिक, राजनैतिक परिस्थिति व त्याचा होमियोपँथीवर होणारा दुरगामी परीणाम या बद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाला डॉ. अंजली पंगारकर, डॉ. उषा मस्तुद, डॉ. पुनम शिंदे, डॉ अनीस अहमद, डॉ. अमृता आगवान, डॉ नवाज शेख तसेच, विद्यार्थी प्रतिनिधी धनंजय तागड ,विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन डॉ द्न्यानेशवर जोशी यानी तर आभार प्रदर्शन सौ संध्या गौशाल यानी केले.

## संत वामनभाऊ महाराज यांच्या पालखी सोहळ्यासाठी शेतकऱ्याने आणली बैलजोडी

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

स्वागतासाठी संपूर्ण गाव उपस्थित होता. पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड येथील संत वामनभाऊ महाराज यांचा पालखी सोहळा गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली सहा जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. आष्टी तालुक्यातील म्हसोबाचीवाडी, लाटेवाडी येथील गणेश शेकडे यांच्या बैलजोडीला यंदाचा पालखीचा मान मिळाला आहे. या वेळी गणेश शेकडे यांनी अडीच लाख रुपयांची बैलजोडी खरेदी केली. या बैलजोडीच्या

शेकडे कुटुंबाच्या वतीने मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. या वेळी उपस्थित सरपंच शिवा शेकडे,



अंकुश महाजन, माजी सरपंच बुवासाहेब शेकडे, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब महाजन, ज्ञानेश्वर गिते, रावसाहेब ससाने, विष्णू महाजन, राम महाजन, अमोल आंधळे, रतन शेकडे, दत्तात्रय महाजन आदी ग्रामस्थ उपस्थित होते. महिला भगिनी यांच्या वतीने बैलजोडीचे औक्षण करण्यात आले. ६ जुलै रोजी पंढरपूरकडे पालखी प्रस्थान होणार आहे.

## बुद्ध विहारासाठी थायलंडहून आली बुद्धमूर्ती

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातील वाल्मिकी नगर येथे असणाऱ्या सूर्यप्रकाश बुद्ध विहारासाठी थायलंड येथून सुंदर अशी बुद्धमूर्ती आली असल्याची माहिती बुद्ध विहाराचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशसिंग तुसाम यांनी दिली. बुद्धमूर्ती पाहण्यासाठी तुसाम यांच्या निवासस्थानी बौद्ध अनुयायांची गर्दी होत आहे.

परळी शहरातील वाल्मिकी नगर येथे सूर्यप्रकाश बुद्ध विहार आहे यापूर्वी या विहारात पाच फुटी पंचधातूची बुद्धमूर्ती बसविण्यात आलेली आहे. विहारात नित्यनेमाने दर रविवारी बुद्ध वंदना होत असते. तसेच धम्म चळवळीत प्रकाशसिंग तुसाम यांचे मोठे योगदान आहे.त्यांच्या धम्म कार्याची दखल घेऊन थायलंड येथून त्यांना साडेचार फुटी धातूची अतिशय सुंदर अशी दुसरी बुद्ध मूर्ती पाठविण्यात आली आहे. ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते विठ्ठलराव झीलमेवाड,पत्रकार विकास वाघमारे यांनी तुसाम यांच्या निवासस्थानी भेट देऊन बुद्ध मूर्ती पाहिली. लवकरच विहारात बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना करणार असल्याचे तुसाम यांनी सांगितले.

## उपळी हायस्कूल उपळी येथे डॉक्टर्स डे उत्साहात साजरा



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील उपळी येथील उपळी हायस्कूल उपळी येथे डॉक्टर्स डे निमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र कुप्पा येथील डॉ. मारुती लगड साहेब यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. आणि विद्यार्थ्यांसाठी आरोग्य किटचे वाटप करण्यात आले.यावेळी डॉक्टर्स डे निमित्ताने डॉक्टर मारुती लगड यांचा सत्कार शाळेच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय भागवत रावजी बडे सर यांनी केले यावेळी पर्यवेक्षक शंकर घाडगे,हनुमान बडे,कालिदास वाघ,त्याच बरोबर शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी मारुती लगड यांनी शाळेमध्ये अट्टल घन वृक्ष लागवड केलेली आहे याची पाहणी करून खूप समाधान व्यक्त केले प्रत्येक शाळेने अशीच अट्टल घन वृक्ष लागवड करून वृक्षारोपण करून त्याचे संगोपन सुद्धा करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

## आमचा कर सरकारला चालतो मग लेकरांना शाळा का नाही –आझाद क्रांती सेनेचा सवाल

माजलगाव । प्रतिनिधी

येथील गटशिक्षण अधिकारी माजलगाव यांना आजाद क्रांती सेनेच्या वतीने निवेदन दि ०३ जुलै बुधवार रोजी देण्यात आले.दि ०२ जुलै रोजी आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे यांनी जायकवाडी या गावास भेट देऊन तेथील परिस्थिती पाहिली परिस्थिती विदारक व भयावह आहे देशाला स्वतंत्र होऊन ७७ वर्ष होऊन गेलेली आहेत तरी देखील या गावातील दलित, शेतकरी, शेतमजूर ,हे स्वातंत्र्यात जगतात की पारतांत्र्यात असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे या गावाला जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेट देणे गरजेचे आहे गावाला जायला रस्ता नाही गावात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही गावात शाळा नाही वर्ग खोले आहेत त्या गळतात त्याच्यात साप खेळतात जनावरे बसतात कधी शाळा पडेल याचा भरोसा नाही अशा स्थितीमध्ये या गावातील लोक राहतात ही भयावह परिस्थिती आहे या गावातील लोकांचा सरकारला कर चालतो पण लेकरांना शिक्षण व गावकऱ्यांना मूलभूत सुविधा का मिळत नाही हा सवाल आता येथील गावकरी विचारू लागले आहेत म्हणून सरकारला जाग करण्यासाठी दिनांक ०३ जुलै बुधवार रोजी गट शिक्षणाधिकारी माजलगाव, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, यांना निवेदन देण्यात आले लवकरात लवकर लेकरांच्या शाळेची व्यवस्था करण्यात यावी नसता तीव्र स्वरूपाचे आंदोलन छोडू अशा आशयाची निवेदनामध्ये मागणी करण्यात आली आहे या निवेदनावरती आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख राजेश घोडे, संजय हिवाळे, अजय भिसे, ऋतिक भिसे, भारत गायकवाड, लक्ष्मण थोरात ,अरुण पिसोळे ,बळी थोरात ,बंडू थोरात, अमोल पिसुळे, विशाल थोरात, नवनाथ लोंढे, बाळू थोरात, राजेश शेवाळे, फकीरा अडागळे, सुरेश पिसोळे, कृष्ण थोरात, गणेश भिसे, आदींनी मागणी केली आहेय



पान ६ वरून...

### बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस

नवनिर्वाचित जिल्हा उपाध्यक्ष सुभाष सपकाळ, लीगल सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड.नागेश तांबारे, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष रमेश शिंदे यांच्यासह विविध सेलचे प्रदेश, जिल्हा व तालुकास्तरावरील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांचे हात बळकट करण्यासाठी बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीने काम करत आहे. लोकसभा निवडणुकीतील अपयश ही महायुतीची सामूहिक जबाबदारी आहे. ती नेत्यांनी स्वीकारली असून ते पुढील कामाला लागले आहेत. पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी देखील नव्या जोमाने पुढे जाणे गरजेचे आहे. आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन मजबूत करा. येणारी प्रत्येक निवडणूक जिंकण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सर्वांनी एकदिलाने कामाला लागावे, असे आवाहन ॲड.राजेश्वर चव्हाण यांनी केले आहे. पुढे बोलताना त्यांनी परळीतील खून प्रकरणी आ.रोहित पवार यांनी केलेल्या बेजबाबदार वक्तव्याचा निषेध नोंदविला. तसेच, मृत सरपंच बापूराव आंधळे यांना सामूहिक श्रद्धांजली वाहिली. यावेळी प्रदेश व जिल्हा कार्यकारणीतील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. डॉक्टर, लीगल व अल्पसंख्यांक सेलच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. प्रास्ताविक व सूत्रसंचलन कार्यालयीन चिटणीस ॲड.महादेव धांडे यांनी केले. आभार प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार यांनी मानले.

काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना मानाचे स्थान द्या–कल्याण आखाडे

प्रदेश, जिल्हा व तालुका पातळीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उत्तमरीत्या काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना मानाचे स्थान द्या. तसेच, सर्वजण एकदिलाने कामाला लागून आगामी निवडणुकात यश खेचून आणावे. नूतन संपर्क कार्यालयात जनता दरबार भरविण्याचा विचार उत्तम आहे. या कार्यालयातून जनसामान्यांची सेवा व्हावी, यासाठी आपण देखील प्रयत्न करणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी म्हटले आहे.

## रा.कॉं.चा संघटनशक्ती मजबूत करण्यावर भर; बीडमधील कार्यकर्त्यांना कार्यकारिणीत स्थान

### ॲड.राजेश्वर चव्हाण, कल्याण आखाडे, डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या हस्ते दिले नियुक्तीपत्र

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आगामी निवडणुका लक्षात घेता बीड जिल्ह्यात संघटनशक्ती मजबूत करण्यावर भर दिला आहे. शहरातील संपर्क कार्यालयात झालेल्या जिल्हास्तरीय बैठकीत पक्षाच्या डॉक्टर, लीगल, अल्पसंख्यांक सेलच्या पदाधिकाऱ्यांना मंगळवारी (दि.२) नियुक्ती देण्यात आल्या. यावेळी प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, बीड जिल्हा महिला आघाडी निरीक्षक वैशालीताई पाटील, रा.कॉं.चे प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार, महिला आघाडीच्या प्रदेश सचिव संगीताताई तुपसागर यांच्यासह प्रदेश जिल्हा कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सुभाष सपकाळ, लीगल सेलच्या जिल्हाध्यक्ष ॲड.नागेश तांबारे, डॉक्टर सेलच्या जिल्हाध्यक्षपदी रमेश शिंदे, अल्पसंख्याक सेलच्या शहराध्यक्षपदी माजेद खाजमिया कुरेशी, बीड जिल्हा



सरचिटणीसपदी मोहम्मद इसाक मोहम्मद मुसा, जिल्हा संघटकपदी अहेमदोद्दीन हमीदोद्दीन सिद्दिकी, तालुकाध्यक्षपदी शेख समीर शेख मुसा, तालुका उपाध्यक्षपदी जावेद शेख चाँद आदींच्या निवडी करण्यात आल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसची संघटनशक्ती मजबूत करण्यावर भर देण्यात आला आहे. दरम्यान, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस नाईकवाडी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शेख एकबाल निसार अहेमद यांच्या मान्यतेने अल्पसंख्याक सेलच्या निवडी करण्यात आल्या. तसेच, वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टर व लीगल सेलच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. दरम्यान, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे नियुक्तीपत्र, पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा ॲड.प्रज्ञाताई खोसरे, जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शेख एकबाल निसार अहेमद, युवक जिल्हाध्यक्ष सुशांतसिंह पवार, परळी विधानसभा अध्यक्ष गोविंद देशमुख, कार्यालयीन चिटणीस महादेव धांडे, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष विजय धायगुडे यांच्यासह विविध सेलचे प्रदेश, जिल्हा, तालुका स्तरावरील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्षाला सरासरी १७० अंडी देणारी देशी कोंबडीची जात विकसित

## अंड्यांचा आकारही मोठा



पुणे : कृषीप्रधान असलेल्या भारतात शेतीला पूरक म्हणून अनेक शेतकरी पशुपालन, कुक्कुटपालन व्यवसाय करतात. अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी कुक्कुटपालन हा कमी खर्चाचा आणि उत्पन्न मिळवून देणारा व्यवसाय आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचा ओढा कोंबडीपालनाकडे असतो. मात्र, बऱ्याचदा या व्यवसायामध्ये शेतकऱ्यांना नुकसानही सहन करावे लागते. मात्र यात एकसारखे संशोधन सुरू असून, वेगवेगळ्या फायदेशीर जाती शोधल्या जात आहेत. आता वर्षाला सरासरी १७० अंडी देणारी देशी कोंबडीची जात शोधण्यात यश आले आहे. याचा शेतकऱ्यांना चांगला फायदा होऊ शकतो.

झारसिम कोंबडी : झारखंड येथील बिरसा कृषी विद्यापीठाने वर्षाला सरासरी १७० अंडी देणाऱ्या देशी कोंबडीची जात विकसित केली आहे. देशी कोंबडीच्या या जातीचे नाव झारसिम आहे. स्थानिक आदिवासी बोलीतील सीम ज्याचा अर्थ कोंबडी असा होतो. आणि म्हणूनच झारखंड मधील झार आणि सिम यांना मिळून झारसिम असे या कोंबडीचे नाव ठेवण्यात आले आहे. अन्य देशी कोंबड्यांच्या तुलनेत ही कोंबडी दुप्पट अंडी देते. तसेच जन्मानंतर या कोंबडीपासून १८० दिवसांतच अंडी उत्पादन सुरू होते.

वर्षाला १७० अंडी देते : झारसिम कोंबडी अन्य देशी कोंबड्यांच्या तुलनेत वर्षाला सरासरी १६५ ते १७० अंडी देते. झारसिम कोंबडीची अंडी सामान्य देशी कोंबडीच्या तुलनेत दुप्पट वजनाची असतात. कारण हिच्या अंड्यांचा आकार सामान्य कोंबडीच्या अंड्यांच्या तुलनेत मोठा असतो. ज्यामुळे त्यांचे वजनही जास्त असते. या कोंबडीच्या एका अंड्याचे वजन साधारणपणे ५० ते ५५ ग्रॅम असते. तर अन्य देशी कोंबड्यांच्या अंड्यांचे वजन ३० ग्रॅमच्या आसपास असते. झारसिम जातीची ही कोंबडी केवळ तीन महिन्यातच दीडकिलोपर्यंत वजनाची होते. झारसिम कोंबडीची सर्वात खासियत म्हणजे ही आकर्षक आणि बहुरंगी असते. ही जीवनकाळही अधिक दिवसांचा असतो. या कोंबडीच्या अंड्यात प्रथिनांचे प्रमाण अधिक असते. याशिवाय या कोंबडीचे मांस उत्पादनही अधिक असते.

## खेकडापालनाचे घ्या व्यवसायीक शास्त्रीय प्रशिक्षण



मासे, कोळंबी, मुळे, खेकडे पालन हे कोकण प्रदेशातील स्थानिक लोकांच्या उदरनिर्वाहाचे मुख्य साधन आहे. कोकण प्रदेशाला लाभलेल्या विस्तृत किनार पट्टीमुळे निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी मासे खेकडा संवर्धनाचे प्रकल्प ठिकठिकाणी कार्यान्वित आहेत. यामधील खेकडा हा प्रामुख्याने मोठे अर्थाजन मिळवून देणारा घटक आहे. या खेकड्याला स्थानिक पातळीवर तसेच प्रादेशिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर देखील मोठी मागणी आहे. आता कोकणा व्यतीरिक्त इतर ठिकाणीही खेकडा पालनाचा व्यवसाय करणे शक्य होत आहे.

परंपरागत शेतीची कास धरली पण वातावरणीय बदल, भेसळयुक्त बियाणे आणि शेतीतील उत्पादनाबाबतची अनिश्चितता यामुळे नवीन काही उत्पन्नाचा पर्याय तरुण बेरोजगार, नवोद्योजक, मत्स्य व्यावसायिक शोधत आहेत. यावर उपाय म्हणून डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांनी परसबागेत, घराच्या पडवीत, बंद असलेल्या गोठ्यात, एवढेच नाही तर अगदी आपल्या घरात अवघ्या १५० बाय १०० च्या जागेत २०० खेकड्यांचे संवर्धन करता येईल असे प्रशिक्षण सुरू केले आहे. सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र , रत्नागिरी येथे 'खेकडा पालन व्यवस्थापन' या विषयावर दि. १८ ते २० जुलै, २०२४ या कालावधीत तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामुळे खेकडा संवर्धनाद्वारे मत्स्य व्यावसायिक, शेतकरी, तरुण बेरोजगार स्वत:ची प्रगती साधू शकतील. यामुळे खेकडा उत्पादन वाढीस चालना मिळेल. म्हणूनच या उदात्त हेतूने सदर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोलीच्या सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्रांतर्गत कार्यरत असलेल्या खेकडा प्रकल्पातील संशोधका मार्फत प्रशिक्षण दिले जाईल.

प्रशिक्षणात हे शिकवणार :

तलावातील खेकडा संवर्धन, तलावामध्ये, खाड्यांमध्ये तरंगत्या फायबर खोक्यांमधील खेकडा संवर्धन, खाडीतील पेन कल्चर पद्धतीने खेकडा संवर्धन. खेकडा शेतीसाठी बांधकाम आणि आवश्यक यंत्र सामुग्री. खेकड्यांच्या विजाची ओळख. खेकड्यांचे खाद्य व्यवस्थापन, पाण्याचे नियोजन. खेकड्यांना उद्भवणारे आजार आणि उपाय. खेकड्यांची सुरक्षित काढणी, बांधणी आणि विक्री व्यवस्थापन. प्रकल्प अहवाल याबाबत त्या क्षेत्रातील तज्ज्ञ शास्त्रज्ञ यांचे कडून शास्त्रोक्त माहिती. यशस्वी संवर्धक यांचे अनुभव कथन, प्रकल्प/प्रक्षेत्र भेट केली जाईल.

## जाणून घ्या मका कापण्याची वेळ आणि पद्धत



भारत हा कृषिप्रधान देश आहे. येथे शेतकरी मोठ्या प्रमाणावर शेती करतात. ७५ टक्क्यांहून अधिक लोकांची उपजीविका शेतीवर अवलंबून आहे. स्वातंत्र्यापूर्वी येथील शेतकरी भरडधान्याची लागवड मोठ्या प्रमाणावर करत असत. यामध्ये मक्याखालील क्षेत्र सर्वाधिक होते. मात्र भात, गहू या पिकांचे क्षेत्र वाढल्याने मक्याची लागवड खुंटली. आता शेतकरी पुन्हा भरड धान्याकडे वळू लागले आहेत. बिहार, पंजाब, हरियाणा, आसाम, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूसह देशभरात शेतकरी मोठ्या प्रमाणावर मक्याची लागवड करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना बंपर उत्पन्न मिळत आहे. विशेष म्हणजे मक्याला स्वीटकॉर्न असेही म्हणतात आणि त्याची काढणी करताना शेतकऱ्यांनी काळजी घेण्याची गरज असते.

स्वीटकॉर्न हे पीक कोणत्याही हंगामात पेरता येते. वसंत ऋतू आणि खरीप हंगामात पेरणी केल्यास स्वीटकॉर्नचे बंपर उत्पादन मिळते. शेतकऱ्यांनी जुलै महिन्यात स्वीटकॉर्नची पेरणी केल्यास चांगले उत्पादन मिळेल. मोठी गोष्ट म्हणजे शेतकरी दुधाळ अवस्थेत स्वीटकॉर्न काढू शकतात. दुधाच्या गोड कॉर्नला बाजारात खूप मागणी आहे. शेतकऱ्यांची इच्छा असेल तर ते २० ते २२ दिवस दुधाळ अवस्थेनंतरही काढणी करू शकतात. मग ते कॉर्न म्हणून वापरले जाते.

मक्याची कापणी फक्त सकाळी आणि संध्याकाळी : स्वीटकॉर्नच्या बियांची उगवण झाल्यानंतर ४५ ते ५० दिवसांनी नर फळे येतात आणि २ ते ३ दिवसांनी मादी फळे दिसतात. खरीप हंगामात, परागकणानंतर १५ ते २० दिवसांनी स्वीटकॉर्नची कापणी करता येते. नेहमी सकाळी आणि संध्याकाळी मक्याची कापणी करावी.

काढणी करताना या गोष्टी लक्षात ठेवा : १ ते ३ सें.मी.चे रेशीम दिसू लागल्यावर बिबकॉर्नचे दाणे उपटावेत. कणीस तोडताना त्याच्या वरची पाने काढू नयेत. पाने काढल्याने ते लवकर खराब होतात. खरीप हंगामात दररोज आणि रब्बी हंगामात एक दिवस, रेशीम आल्यापासून २ ते ३ दिवसांच्या आत शेंगांची काढणी करावी. सिंगल क्रॉस हायब्रीड मक्यामध्ये ३ ते ४ वेणी लागतात.

## 'गोकुळ'च्या गाय दूध विक्रीत दोन रुपयांची वाढ

कोल्हापूर : राज्यातील सर्वच सहकारी आणि खासगी दूध संघांनी गाय दूध दरात वाढ केली आहे. दरम्यान, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक (गोकुळ) संघाने मुंबई आणि पुणे येथे विक्री होणाऱ्या गाय दुधाच्या दरात प्रतिलिटर दोन रुपयांची वाढ केली आहे. त्यामुळे, पूर्वी प्रतिलिटर गाय दूध ५४ रुपयेला विक्री होत होते. हाच दूध दर आता ५६ रुपये झाला असल्याचे परिपत्रक काढले आहे.

'गोकुळ'च्या गाय दुधाची मुंबईमध्ये तीन लाख लिटर आणि पुण्यात ४० हजार लिटरची विक्री होते. दूध पावडर विक्रीमध्ये तोटा सहन करणाऱ्या संघांना या दरवाढीमुळे काहीसा दिलासा मिळणार आहे. दरम्यान, मुंबई व पुणे येथे 'गोकुळ'च्या चांगल्या आणि दर्जेदार दुधाला मोठी मागणी आहे. इतर संघांनी विक्री दर वाढवला असतानाही 'गोकुळ'ने काही दिवस आपले दर कमीच ठेवले होते. दरम्यान, वाढता खर्च आणि दूध पावडरीमधील होणाऱ्या तोट्याचा ताळमेळ घालण्यासाठी सध्या वाढलेल्या दरामुळे उत्पादक आणि संघाला हातभार लागणार आहे. राज्यातील सर्वच दूध संघांनी दरवाढ केल्यानंतर 'गोकुळ'नेही दरवाढ करावी, अशी चर्चा संचालक मंडळाच्या बैठकीत झाली होती. त्यानुसार कालपासून ही दरवाढ लागू करण्यात आली आहे. दरम्यान, दरवाढीमुळे दूध विक्रीवर कोणताही परिणाम झालेला दिसून येत आहे. पूर्वीप्रमाणे दूध विक्री सुरू असून आणखी दुधाला मागणी वाढण्याची शक्यता आहे. गोकुळ दूध संघाचे अध्यक्ष अरूण डोंगळे म्हणाले की, 'राज्यातील सर्व दूध संघांनी मुंबई आणि पुण्यातील गाय दूध विक्रीचे दर वाढवले आहेत. त्यामुळे 'गोकुळ'नेही प्रतिलिटर दोन रुपये दर वाढ करण्याचा निर्णय घेतला आणि त्यानुसार तो लागू केला आहे. गोकुळ दूध संघाची मुंबई शहरात ३ लाख लिटर दूधाची विक्री होते पूर्वीचा दर ५४ रूपये होता तो आता ५६ रूपये करण्यात आला आहे. तर पुणे शहरात ४० हजार लिटर दुधाची विक्री होते पूर्वी ५४ रूपये असलेला दर आता ५६ रूपये करण्यात आला आहे.

# लाल कंधारी गाय देते अधिक काळ दूध



ग्रामीण भागात शेतीनंतर पशुपालन व्यवसाय हा सर्वात चांगला आणि उत्पन्नाचा सर्वात मोठा स्त्रोत मानला जातो. स्वत:ला आर्थिकदृष्ट्या मजबूत बनवण्यासाठी शेतकरी शेतीसोबतच पशुपालनही करतात. पशुपालकांमध्येही, शेतकऱ्यांमध्ये गाय पाळणे सर्वाधिक लोकप्रिय आहे. गाय केवळ दूधच देत नाही तर शेतीसाठी शेणखतही देते, त्यामुळे शेतीचा खर्चही कमी होतो. त्यामुळे प्रत्येक वर्गातील शेतकऱ्यांचा कल गाय पालनाकडे वाढत आहे.

तुम्हीही गाय पाळण्याचा विचार करत असाल तर तुम्ही लाल कंधारी गाय पाळू शकता. लाल कंधारी गाय ही लहान शेतकऱ्यांसाठी अतिशय फायदेशीर गाय आहे, कारण तिची काळजी घेण्यासाठी फारसा खर्च येत नाही आणि तिला नेहमी हिरवा चारा द्यावा लागत नाही. गाईची ही जात चौथ्या शतकात कंदहारच्या राजांनी विकसित केली होती, असे मानले जाते. त्याला लाखलबुंडा असेही म्हणतात. तर लाल कंधारी गायीची प्रतिदिन ४ ते ५ लिटर दूध देण्याची क्षमता आहे. दुग्धोत्पादनाबद्दल बोलायचे झाले तर ही जात वर्षातील २७५ दिवस सतत दूध देते.

कंदहारी गायीचे मूळ : या जातीच्या गायीचे मूळ ठिकाण कंधार, नांदेड, जिल्हा महाराष्ट्र आहे. त्याला 'लाखलबुंडा' असेही म्हणतात. ही महाराष्ट्रातील नांदेड, परभणी, अहमदनगर, बीड आणि लातूर जिल्ह्यात आढळते. या जातीचे प्राणी मध्यम आकाराचे आणि गडद लाल रंगाचे असतात. ही जात हलक्या लाल ते तपकिरी रंगात येते. त्याची शिंगे वाकडी, कपाळ रुंद, कान लांब, कुबडा व लटकणारी त्वचा मऊ, डोळे चमकदार व पाठीवर गोल काळे डाग असतात. या जातीच्या नराची सरासरी उंची ११३८ सेमी आणि मादीची सरासरी उंची १२८ सेमी आहे. ही जात एका बछड्यात सरासरी ६०० ते ६५० किलो दूध देते, ज्यामध्ये चरबीचे प्रमाण ४.५ टक्के असते. पहिल्या बछड्याच्या वेळी, या जातीच्या मादीचे वय ३०-४५ महिने आणि तिचे एक बछडे १२-२४ महिन्यांचे असावे.

चाऱ्याची गरज : या जातीच्या गाईंना आवश्यकतेनुसार चारा द्यावा. शेंगांचा चारा देण्यापूर्वी त्यात भुसा किंवा इतर चारा घालावा. जेणेकरून पोट फुगणे किंवा अपचनाचा त्रास होणार नाही.

हिरवा चारा : बरसीम (पहिले, दुसरे, तिसरे आणि चौथे पीक), लुसर्न (सरासरी), चवळी (लांब आणि लहान प्रकार), गवारणा, सेंजी, ज्वारी (लहान, पिकलेले, पिकलेले), मका (लहान आणि पिकलेले), ओट्स, बाजरी, हत्ती गवत, नेपियर बाजरी, सुदान गवत इ.

कोरडा चारा : बरसीम गवत, ल्युसर्न गवत, ओट गवत, भुसभुशीत, कॉर्न कोंब, ज्वारी आणि बाजरीचा भुसा, उसाचे गवत, दुर्वा गवत, मक्याचे लोणचे, ओटाचे लोणचे इ.

शेडची गरज : प्राण्यांच्या चांगल्या कामगिरीसाठी त्यांना अनुकूल पर्यावरणीय परिस्थिती आवश्यक असते. अतिवृष्टी, कडक ऊन, बर्फवृष्टी, थंडी आणि परजीवी यांपासून प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी शेडची आवश्यकता आहे. निवडलेल्या शेडमध्ये स्वच्छ हवा आणि पाण्याचा प्रवेश असल्याची खात्री करा. जनावरांच्या संख्येनुसार खाद्य साठवण्याची जागा मोठी आणि मोकळी असावी जेणेकरून त्यांना अन्न सहज खाता येईल. जनावरांचा कचरा ड्रेनेज पाईप ३०-४० सेमी रुंद आणि ५-७ सेमी खोल असावा.




### महत्वाच्या घटना

१०५४ : वृषभ राशीत 'क्रॅब नेब्यूला' दिसत असल्याचे चिनी लोकांना समजले. नंतर जॉन बेव्हिसने इ. स. १७३१ मधे त्याचे निरीक्षण केल्याची नोंद आहे.
१७७६ : अमेरिकेने स्वत:ला इंग्लंडपासून स्वतंत्र घोषित केले.
१७८९ : इस्ट इंडिया कंपनीने मराठा शासक पेशवा आणि निजाम शासक यांच्याबरोबर टिपू सुलतान यांच्या विरुद्ध खिलाफत ची संधी केली.
१८२६ : अमेरिकेच्या स्वातंत्र्य दिनाच्या सुवर्णमहोत्सवाच्या दिवशी अमेरिकेचे तिसरे राष्ट्राध्यक्ष थॉमस जेफरसन आणि दुसरे राष्ट्राध्यक्ष जॉन ॲडॅम्स यांचे निधन झाले.
१८८६ : फ्रांसने अमेरिकेला स्टॅच्यू ऑफ लिबर्टी हे भेट दिले.
१९०३ : मोटर रेस स्पर्धे मध्ये भाग घेणारी डॉरोथी लेव्हिट ही पहिली इंग्लिश महिला ठरली.
१९११ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या एकांतवासास प्रारंभ
१९३६ : 'अमरज्योती' हा 'प्रभात'चा चित्रपट मुंबईच्या 'कृष्ण' सिनेमात प्रदर्शित झाला.
१९४६ : सुमारे ३८१ वर्षे परकीय सत्तांनी राज्य केल्यानंतर फिलीपाइन्सला (अमेरिकेपासून) स्वातंत्र्य मिळाले.
१९४७ : ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या भारताचे 'भारत' व 'पाकिस्तान' असे दोन स्वतंत्र देश निर्माण करावेत असा ठराव ब्रिटनच्या संसदेत मांडण्यात आला.
१९९५ : टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोपचे संचालक डॉ. गोविंद स्वरूप यांना एम. पी. बिर्ला पुरस्कार प्रदान
१९९७ : 'नासा'चे पाथफाइंडर हे मानवविरहित यान मंगळावर उतरले.
१९९९ : लष्कराच्या १८ व्या बटालियनने कारगिलमधील द्रास या उपविभागातील 'टायगर हिल्स' हा लष्करीदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा टापू घुसखोरांच्या ताब्यातून मुक्त केला. याबद्दल लष्करप्रमुख वेदप्रकाश मलिक यांनी १८ व्या युनिटला 'युनिट सायटेशन' हा विशेष सन्मान जाहीर केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९० : भारताचे सर्वेक्षण करणारे कर्नल सर जॉर्ज एव्हरेस्ट (मृत्यू: १ डिमेंबर १८६६)
१८०७ : जुसेप्पे गॅरीबाल्डी इटालियन सेनापती व राजकीय नेता (मृत्यू: २ जून १८८२)
१८९७ : भारतीय कार्यकर्ते अलारी सीताराम राजू यांचा जन्म. (मृत्यू: ७ मे १९२४)
१८९८ : गुलजारीलाल नंदा - भारताचे दुसरे पंतप्रधान, स्वातंत्र्यसैनिक व गांधीवादी कार्यकर्ते (मृत्यू: १५ जानेवारी १९९८)
१८७२ : काल्व्हिन कूलिज - अमेरिकेचे ३० वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ५ जानेवारी १९३३)
१८८२ : एकेडेमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सचे स्थापक लुईस बी. मेयर यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑक्टोबर १९५७)
१९१२ : पं. निवृत्तीबुवा सरनाईक - जयपूर-अत्रौली घराण्याचे गायक (मृत्यू: १६ फेब्रुवारी १९९४)
१९१४ : निवृत्तीनाथ रावजी पाटील ऊर्फ 'पी. सावळाराम' - भावगीतलेखक. कुसुमाग्रज यांनी त्यांना 'जनकवी' ही उपाधी दिली. (मृत्यू: २१ डिसेंबर १९९७)
१९१६ : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री नसीम बानो यांचा जन्मदिन.
१९२६ : विनायक आदिनाथ तथा 'वि. आ.' बुवा - विनोदी साहित्यिक (मृत्यू: १७ एप्रिल २०११)
१९८३ : भारतीय-इंग्लिश पत्रकार अमोल राजन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२९ : कान्होजी आंग्रे - सेना सरखेल (जन्म: ऑगस्ट १६६९)
१८२६ : जॉन ॲडॅम्स - अमेरिकेचे २ रे राष्ट्राध्यक्ष आणि पहिले उपराष्ट्राध्यक्ष (जन्म: ३० आक्टोबर १७३५)
१८२६ : थॉमस जेफरसन - अमेरिकेचे ३ रे राष्ट्राध्यक्ष, २ रे उपाध्यक्ष आणि १ ले परराष्ट्रमंत्री. त्यांनी मांडलेल्या विचारांवर अमेरिकेची राज्यघटना आधारित असून तेथील लोकशाहीला 'जेफरसनची लोकशाही' असे म्हणतात. (जन्म: १३ एप्रिल १७४३)
१८३१ : जेम्स मोन्रो - अमेरिकेचे ५ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २८ एप्रिल १७५८)
१९०२ : स्वामी विवेकानंद - भारतीय तत्त्वज्ञानाचा जगभर प्रसार करणारे तत्त्वज्ञ, रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य, गुरुंची स्मृती चिरंतन राहावी यासाठी त्यांनी 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना केली. (जन्म: १२ जानेवारी १८६३)
१९३४ : मेरी क्यूरी - नोबेल पारितोषिक विजेत्या पोलिश-फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ७ नोव्हेंबर १८६७)
१९६३ : पिंगाली वेंकय्या - भारतीय तिरंग्याचा रचनाकार (जन्म: २ ऑगस्ट १८७६)
१९८० : रघुनाथ वामन दिघे - रसाळ लेखन करणारे कादंबरीकार. 'पाणकळा', 'सराई', 'पड रे पाण्या', 'आई आहे शेतात', 'गानलुब्धा', 'मृगनयना' वगैरे त्यांच्या कादंबर्या अतिशय गाजल्या. (जन्म: २४ एप्रिल १८९६)
१९८२ : भरत व्यास - भक्तिप्रधान, पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक चित्रपटांचे गीतकार (जन्म: १९१८)
१९९९ : वसंत शिंदे - विनोदसम्राट, कलागौरव पुरस्कार, चित्रभूषण पुरस्कार व बालगंधर्व पुरस्काराने सन्मानित (जन्म: १४ मे १९०९).

# धनगर, वडार समाजाला एसटी प्रवर्गाच्या आरक्षणाची अमलबजावणी होत नाही तोपर्यंत उपोषण करणार

## उपोषणाचा पाचवा दिवस : उपोषणकर्ते आकाश निर्मळांची प्रकृती खालावली

बीड । प्रतिनिधी

धनगर व वडार जमतीचा एस्? टी प्रवर्गात आरक्षणाची अंमलबजावणी करा यासाठी भाई आकाश निर्मळ यांचे आमरण उपोषण २९ जून पासून बार्शी नाक्यावर सुरु आहे. गेल्या ३३ वर्षापासून धनगर व वडार जमातीचा एस्? टी प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी आंदोलन चालू आहे. या मागणीसाठी राज्य सरकारचे लक्ष केंद्रित करण्यासाठी बुधवार दिनांक २९ जून पासून बार्शी नाका येथे जुन्या आरटीओ मैदानावर भाई आकाश निर्मळ यांचे लोकशाही मार्गाने आमरण उपोषण चालू आहे.मात्र आजपर्यंत शासनाने या उपोषणाची दखल घेतली नाही.




धनगर व वडार समाज आर्थिक दृष्ट्या मागासलेला असून या भटक्या जातीच्या समावेश एसटी प्रवर्गात करावा अशी गेल्या अनेक दिवसापासून मागणी होत आहे .मात्र या मागणीला राज्य सरकार सकारात्मक प्रतिसाद देत नाही. या मागणीला अधिक धार आणण्यासाठी भाई आकाश निर्मळ यांनी धनगर आणि वडार समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी करा यासाठी अमर उपोषण सुरू केले आहे. गेल्या पाच दिवसापासून हे उपोषण चालू असून या उपोषणास भेट देण्यासाठी वडार समाज बांधव लक्ष्मण लष्कर हे पारनेर तालुक्यातील मुठगांव येथुन आवर्जून आले होते. तसेच ऑल इंडिया पँथर आर्मीचे जिल्हा अध्यक्ष नितीन सोनावणे, जय मल्हार युवा सेनेचे संस्थापक अध्यक्ष मा. विष्णुजी देवकते, शेतकरी कामगार पक्षाचे माजलगांव तालुका चिटणीस भाई लहुराव सोळुंके, यशवंत सेनेचे सरसेनापती गणेश कोळेकर पाटील वडार शैक्षणिक जनजागृतीचे अध्यक्ष दिपकराव चौगुले यांच्यासह विविध संघटनेचे नेते, पदाधिकारी कार्यकर्ते सर्व सामान्य धनगर व वडार समाज बांधव उपोषण स्थळी भेट देत आहेत. पण आमरण उपोषणाचा आज चौथा दिवस उलटला तरी शासकीय यंत्रणा अजुनही निद्रावस्थेत असल्याने अद्यापही शासकीय व आरोग्य अधिकारी या उपोषणाकडे साधा फिरकला नाही. जोपर्यंत धनगर आणि वडार समाजाला जोपर्यंत एस्? टी प्रवर्गाची आरक्षणाची अंमलबजावणी होत नाही. तोपर्यंत आपण उपोषण सोडणार नाहीत असा पवित्रा भाई आकाश निर्मळ यांनी घेतला आहे.

# शेतकऱ्यांच्या जमीनीत जबरदस्तीने रस्ता करुन माती व मुरुमाची चोरी

## शेतकऱ्यांची तहसीलदारांकडे लेखी तक्रार

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे मांजरसुंबा येथील शेतकरी विठ्ठल पि.सोपान रसाळ, सुग्रीव पि.सोपान रसाळ, जगन्नाथ पि.सोपान रसाळ, रामहरी पि.सोपान रसाळ यांच्या मालकी व ताब्यातील जमीनीत येथील काही लोकांनी जबरदस्तीने माती व मुरुमाची चोरी केली असल्याने त्यांनी तहसीलदार बीड यांच्याकडे लेखी तक्रार करुन नुकसानभरपाईची व कार्यवाहीची मागणी केली आहे.

मौजे मौजे मांजरसुंबा ता.जि.बीड येथील शेतकरी नामे विठ्ठल पि.सोपान रसाळ, सुग्रीव पि.सोपान रसाळ, जगन्नाथ पि.सोपान रसाळ, रामहरी पि.सोपान रसाळ यांची सर्व्हे नंबर/ गट क्रमांक १२८/२ मध्ये १ हे ९ आर जमीन आहे यापैकी जवळपास १ एकर जमीनीवर आरोपी नामे शेख मुन्तेजर मिन्हाजोद्दीन, शेख मक्सुद पाशा सुभानी पाशा,दोघे रा.नेकनूर ता.जि.बीड आणि अक्षय अशोक



लोढा, रा.चौसाळा, ता.जि.बीड या सर्वांनी मिळून संगनमत करुन बळजबरीने शेतातून रस्ता तयार करुन रात्रीच्या वेळी टिप्पर व पोकलेनच्या सहाय्याने मुरुम व मातीची चोरी केली असून या संदर्भात मुरुम चोरतांना दिवसा वरील शेतकर्यांनी आरोपींची भेट घेवून आमच्या शेतातून वाहने नेऊ नका अशी विनंती केली होती. ज्या शेतकर्याने काही दिवसांपुर्वी आरोपींना जमीन विकली आहे त्यांनी देखील उपरोक्त शेतकर्यांना सांगितले की मी आरोपींना सांगितले आहे की सदरील जमीन क्षेत्र हे तुमचे नाही परंतू ते काहीही म्हणणे ऐकायला तयार होत नाहीत त्यामुळे शेतकर्यांनी संबंधित तिघांवर गुन्हा नोंद करुन मुरुम व माती चोरीची सखोल चौकशी करण्यात यावी व आम्हाला नुकसान भरपाई मिळावी अशी तक्रार तहसीलदार बीड यांच्याकडे केली आहे.

जर नुकसान भरपाई व आरोपींवर कार्यवाही झाली नाही तर विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयासमोर उपोषणाला बसणार आहोत असे पत्रकाद्वारे कळविले आहे.

## थोडक्यात

### कारवाईतील जप्त गाईला जीवदान

बीड : अतिशय क्रूड पद्धतीने एकाच वाहनात कोंबून एका गाभण गाईला चालवले असताना गोरक्षकाच्या मदतीने पोलिसांनी कारवाई करून सदरील जनवारे जप्त केली व आंबेजोगाई येथील गोशाळेत सोडण्यात आली



यानंतर मरणाच्या दारात असलेल्या गाभण गाय मशीनच्या साह्याने जीवदान देण्यात आले देवतारे त्याला कोण मारी अशीच काहीशी घटना घडली आहे. गत काही दिवसापूर्वी स्थानिक गोरक्षक , पोलीस प्रशासन यांच्या सहकार्याने प्राण्यांना क्रूरतेने दाटीवाटीने कोंबून त्रास होईल, या पद्धतीने वाहतूक करीत घेवून जात असताना पकडून वाहन व चालक व इतर व्यक्तिवरती केलेल्या कार्यवाही मधील जप्त पशुधन हे गोशाळेत सोडली होते. त्यापैकी एक गाय व तीच्या पोटातील वासरू हि दोघेही अत्यवस्थेत होती. कार्यवाही नंतर दोन दिवस ती वाहनात बसून होती व गोशाळेत आल्यास ही बसून होती. पोटात वासरू होते. सदरील गाईला व वासराला काही होवू नये म्हणून प्रयत्न करण्यात आले. मात्र, देव तारी त्याला कोण मारी, असे काहीसे घडले आहे. गोशाळेत तिला आणल्या नंतर तिला मशीन चे साह्याने उचलून बसवत होते. शेवटी तिने छोट्याश्या गोंडस बाळास जन्म दिला असून यातनेतून मुक्त होत थोडी हलकी झाली. गाय व बाळ सध्या सुखरूप आहे. आपल्या सर्वांच्या आशीर्वाद व प्रेमाने ती व वासरू सुखरूप आहे. गाय वाचविण्याचे पुण्य प्रयत्न करणाऱ्या गोरक्षकांना ऍड ,अशोक मुंडे यांना प्राप्त झाले आहे.

### सार्वजनिक साठे जयंतीची समिती गठीत

बीडः बीडमध्ये साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. त्या अनुषंगाने १०४ व्या जयंतीच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्त्या सुशीलाताई मोराळे तर सचिवपदी प्रवीण थोरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या बैठकीमध्ये शहरातील विविध कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये हा निर्णय घेण्यात आला. बीड शहरातील ४० वर्षाची साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठेची जयंतीची परंपरा आजही मोठ्या उत्साहात साजरी होते. महाराष्ट्राच्या लक्ष वेधून घेणारी बीड शहराची जयंती याही वर्षी मोठ्या थाटामाटात साजरा करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यासाठी या जयंतीच्या तयारीकरिता महत्वपूर्ण बैठक होवून समिती गठीत करण्यात आली आहे. यंदाचा साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे महोत्सव तेवढ्याच आनंदात आणि विविध उपक्रम, कार्यक्रम राबवून साजरा केला जाणार आहे. अशी माहिती साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक महोत्सव समितीचे निमंत्रक सुभाष लोणके, आनंद चांदणे यांनी दिली.

### सेवानिवृत्तांनी बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड : जिल्हातील नेव्हीमधुन सेवानिवृत्त झालेले माजी सैनिक/विधवा/अवलंबित यांचेकरीता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय बीड येथे दिनांक १० जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर बैठक ही नेव्हल हेडक्वार्टर्स मुंबई यांचेमार्फत आयोजित करण्यात आलेली आहे. या बैठकीमध्ये नेव्हीमधुन सेवानिवृत्त झालेले माजी सैनिक/विधवा/अवलंबित यांचेशी वार्तालाप व त्यांच्या असलेल्या विविध अडचणींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तरी जिल्हयातील नेव्हीमधुन सेवानिवृत्त झालेले माजी सैनिक/विधवा/अवलंबित यांनी दिनांक १० जुलै २०२४ रोजी कार्यालयामध्ये आपल्या असलेल्या विविध अडचणींबाबत सविस्तर माहीती सर्व कागदपत्रकांसह तीन प्रतींमध्ये सोबत घेऊन यावे जेणेकरुन अडचणींचे निराकरण करणे सुलभ होईल. तरी नेव्हीमधुन सेवानिवृत्त झालेले माजी सैनिक/विधवा/अवलंबित यांनी सदर बैठकीसाठी उपस्थीत राहावे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी बीड यांनी कळविले आहे.

# महिलांना माझी लाडकी बहिण योजना लाभ घेण्याकरिता शिवसंग्राम करणार मदत

बीड । प्रतिनिधी

महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यात अर्ज दाखल करण्यास सुरवात झाली आहे. योजनेची आणि कागदपत्रांची आपुरी माहिती, कागदपत्रांची जुळवाजुळव अर्ज भरताना येणाऱ्या अडचणी तलाठी, सेतू ,तसेच झेरॉक्स दुकानावर महिला ची गर्दी होत आहे. त्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना साठी लागणारी कागदपत्र कोणत्या तारखेपर्यंत दयाचे हे माहित नसल्यामुळे कार्यलया जवळ त्यांची तारांबळ होत आहे. याचा फायदा घेत महिलांची आर्थिक लूट होत आहे. यासाठी शिवसंग्राम भवन, नगर रोड ,बीड येथे महिलांसाठी मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहे. यात महिलांसाठी ऑनलाईन अर्ज दाखल करून देण्यात येणार आहेत त्याचबरोबर या योजनेसाठी लागणारे कागदपत्र काढण्यासाठी देखील मदत करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना ''घोषित केलेली आहे यामध्ये रुपये १५००/ महिलांच्या खात्यामध्ये जमा होणार आहे. सदर योजना महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत राबवल्या जाणार आहे आणि १५जुलै पर्यंतच कागद पत्रे देण्याची मुभा दिलेली आहे .राज्यातील २१ ते ६० वयोगटातील आणि कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाखापेक्षा जास्त नसलेल्या महिलांना ही योजना लागू असून या योजनेंतर्गत दरमहा १ हजार ५०० रुपये दरमहा लाभार्थी महिलेच्या आधार लिंक केलेल्या थेट लाभ हस्तांतरण सक्षम बँक खात्यात जमा होणार आहेत. राज्य शासन समाजहिताच्या अनेक योजना राबवित असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा अधिकाधिक पात्र भगिनींना लाभ होईल तसेच या योजनेसंदर्भात काही अडचण असल्यास या मदत कक्षाशी संपर्क साधू शकता किंवा संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत आजपासून संपूर्णतः अभियान

बीड । प्रतिनिधी

निती आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हयात आकांक्षित तालुका म्हणून निवड आलेल्या वडवणी तालुक्यान गुरुवार ४ जुलै २०२८ पासून संपूर्णता अभियान राबविण्यात येणार आहे हे अभियान ४ जुलै ते ११ जुलै कालावधीत असेल.आकांक्षित तालुका अंतर्गत असलेल्या विविध प्रकारच्या ६ निर्देशांकावर लक्ष केंद्रीत करून उपक्रम राबविणे आणि त्याव्दारे आगामी ३ महिन्यांच्या काळात तालुक्याच्या विकास उद्दीष्टाची सरासरी राज्याच्या एकूण सरासरीपेक्षा पुढे नेणे असे नियोजन असल्याची माहिती आकांक्षित जिल्हा व तालुका जिल्हास्तरिय कार्यकारी समिती अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिली आहे.

पथनाट्य स्पर्धा, पोस्टर स्पर्धा तसेच आरोग्य तपासणी शिबीर, उच्च रक्तदाब व मधुमेहासाठी पौष्टीक आहार मेळावा तसेच भागधारकांची जनजागृती रॅली आदींचे आयोजन या अभियानच्या प्रारंभीच्या टप्यात करायचे आहे. लोकसहभाग घेऊन आरोग्य केंद्र, अंगणवाड्या तसेच कृषी विज्ञान केंद्र आदी ठिकाणी स्थानिक प्रभावशाली व्यक्तींच्या माध्यमातून तसेच पथनाट्य, गीत, कवितावाचन स्पर्धा आदीव्दारे लोकांपर्यंत जनजागृती या काळात केली जाणार आहे. शाळांमधील विद्यार्थ्यांची प्रभातफेरी तसेच ग्रामसभा याव्दारे प्रतिज्ञा घेणे तसेच स्वयं सहायता गटांचे प्रदर्शन, आरोग्य शिबीर आणि औषधी वितरण आदी या कालावधीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तालुका पातळीवर मॅरेथॉन तसेच गावपातळीवर क्रीडा स्पर्धांचे आयोजन स्थानिक कलाकारांचे कार्यक्रम, सादरीकरण आदी बाबींचे आयोजन करण्याच्या सूचना देखील यात आहेत. जन्मपूर्व चाचणीत गर्भवती महिलांची टक्केवारी वाढावी, मधुमेह असणा-या व्यक्तींची तपासणीव्दारे नेमकी टक्केवारी निश्चित करणे, उच्च रक्तदाब असणा-यांची संख्या शोधणे, अंतर्गत पुरक पोषण आहार घेणाऱ्या महिलांची टक्केवारी तसेच मृदा आरोग्य कार्ड निश्चिती तसेच खेळते भांडवल मिळालेला बचत गटांची संख्या वाढविणे आदी निर्देशांकावर या अभियानात भर असेल.

# मनोज जरांगे पाटील यांना वाय दर्जाची सुरक्षा द्या-नितीन सोनवणे

**पाटोदा । प्रतिनिधी**

**संघर्ष योध्दा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या सुरक्षेचा प्रश्न सध्या ऐरणेवर आला आहे. कालची झालेली जी घटना आहे.त्या घटनेत एखादा समाजाचा नेता आपल्या घरी असतांना त्यांच्या घरावरुन ड्रोन कैमेरा फिरतो. आणि तो कोणाचा होता हे माहित नसण ही बाब सुरक्षेच्या दृष्टीने घातक आहे.**

आज मनोज जरांगे पाटील म्हणजेच महाराष्ट्रातील करोडो मराठा समाजाचे दैवत असल्याची प्रतिमा निर्माण झाली असून त्यांना काही हानी पोहचल्यास महाराष्ट्राचं वातावरण बिघडणार नाही याची हमी काय ? तसेच सामाजिक बांधिलकी जोपासत लोकशाही मार्गाने समाजाच्या हिताचा लढा देण्याऱ्याची सुरक्षा करणे हे आपल्या घटनेत नमुद असून अशा लोकांची सुरक्षा ही हितकर ठरते. याच्यासाठी सामाजिक सलोखा आबाधित ठेवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांची सुरक्षा ही महत्त्वाची ठरते. म्हणून त्यांना वाय दर्जाची सुरक्षा देण्यात यावी अशी नितीन सोनवणे जिल्हाध्यक्ष ऑल इंडिया पॅंथर सेना, वशीम भाई शेख, सचिव, कावेरी जाधव महीला शहर अध्यक्ष, दयाबाई वाघमारे यांची मागणी आहे.



# सोमेश्वर विद्यालयात यशवंतांचा सन्मान



घाटनांदूर । प्रतिनिधी

उद्याच्या सावलीसाठी आज उन सहन करा तद्वतच आज तुम्ही बीज आहात, उद्या नव्या रुपात अंकुराल तेंव्हा तुमचे कोणत्या झाडात रुपांतर होईल ते सांगता येणार नाही, असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांनी येथिल अमृतमहोत्सवी सोमेश्वर शैक्षणिक संकुलातील दहावी-बारावीमधील यशवंताचा सन्मानसोहळ्यात केले.

बहुजणांचे ज्ञानपीठ श्री सोमेश्वर शिक्षण संस्था, घाटनांदूर संचलित श्री सोमेश्वर विद्यालय-मुलांचे, श्री सोमेश्वर ज्युनियर कॉलेज आणि श्री सोमेश्वर कन्या प्रशालेतील नव्वद टक्के पेक्षा अधिक गुण घेवुन उत्तीर्ण झालेल्या दहावी-बारावी आणि एनएमएमएस मधील सोळा यशवंतांचा सन्मान आई-वडीलांसह डॉक्युमेंट फाईल, पेढा व पुष्पगुच्छ देवुन उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विभागीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्काराचे मानकरी संजय रानभरे यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुषिपगुच्छ देवुन सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे यावेळी निकालाचे खरे मानकरी विषय शिक्षक व कला शिक्षकांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी मंचावर संस्था सचिव अजित देशमुख, संचालक मुअ आर.पी.मुळे, केंद्रप्रमुख श्री ए.पी.कोपले, तालमार्तंड प्रकाश बोरगावकर, प्राचार्य दि.ना.फड, मुख्याध्यापिका श्रीमती एस.के.जाधव, पर्यवेक्षक कृष्णा देशमुख, एस.एस.नखाते, पत्रकार गोविंद जाधव, गणेश जाधव व धनंजय जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दिपक वजाळे यांनी अनेक शिक्षण, करियर्स, वेळेचा सदुपयोग, सातत्य, उन-सावली, अवांतर वाचन व गुणवत्ता आदी विषयावर मार्मिक, प्रबोधनात्मक, प्रेरक व संदर्भप्रचुर प्रकाश टाकला.

घाटनांदूर पंचक्रोशित शिक्षणाचा नवा पॅटर्न राबवुन सर्वाधिक निकाल व सर्वोच्च गुणवत्तेचा मानकरी ठरलेल्या सोमेश्वर शैक्षणिक संकुलातील लक्षवेधी सन्मानसोहळ्याचे यशवंत विद्यार्थी, पालक व शिक्षणप्रेमींनी अभिनंदन केले आहे. या सन्मान सोहळ्याचे अभ्यासपुर्ण प्रस्ताविक आर.बी.कोलपुसे तर सुत्रसंचलन एफ.एफ.शेख-श्रीमती एस.ए.देशमुख यांनी तर आभार प्रदर्शन एस.आर.शेळके यांनी केले.

# माझी वसुंधरा कार्यक्रमाअंतर्गत नगर परिषदेकडून वृक्षारोपण

धारूर/ प्रतिनिधी

माझी वसुंधरा कार्यक्रमांतर्गत धारूर नगर परिषदेच्या वतीने घनकचरा डंपिग ग्राउंड येथे पर्यावरण पूरक असणारी झाडे शिसम, करंजी, वड इत्यादी प्रकारच्या २५० झाडांची लागवड करण्यात आली पर्यावरणाचा होत असलेला समतोल राखण्यासाठी वृक्ष लागवड महत्त्वाची आहे.त्या अनुषगाने धारूर नगर परिषदेच्या वतीने वृक्ष रोपण आयोजित केले होते.



पर्यावरणाचे रक्षण करणे ही सामूहिक जबाबदारी आहे त्या दृष्टीने प्रत्येक बिघडलेला पर्यावरणाचा समतोल कायम राखण्यासाठी वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक आहे जेणेकरून पर्यावरण समतोल राखला जाईल या प्रमुख उद्देशाने धारूर नगर परिषदेच्या वतीने व माजी वसुंधरा या कार्यक्रमांतर्गत तीन जून २०२४ रोजी वृक्षारोपण कार्यक्रम मुख्याधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला.माझी वसुंधरा या कार्यक्रमांतर्गत नगरपरिषदेने आंबाचोंडी रस्त्या लगत असणाऱ्या डम्पिंग ग्राउंड वर विविध प्रकारची झाडे लावून माझी वसुंधरा दिन साजरा केला नागरिकांनी वृक्ष लागवड करून वृक्ष संवर्धन करणे काळाची गरज आहे. जास्तीत जास्त झाडे आपल्या परिसरात लाऊन त्याचे संगोपन करावे पर्यावरण पूरक शिसम, करंजी व वड यासारख्या विविध २५० झाडांची लागवड करण्यात आली या वेळी नगर परिषदेचे म्घ्याधिकारी , लेखपाल, सफाई कर्मचारी,कुशल व अकुशल कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा आरक्षण प्रश्न केंद्र सरकारने निकाली काढावा - खा.रजनी पाटील

## राष्ट्रपतीच्या अभिभाषनावर खा.रजनी पाटील यांचे सरकारवर टिकास्त्र

केज । प्रतिनिधी

महाराष्ट्रात मराठा आरक्षण प्रश्न तीव्र झाला असताना राज्य सरकार याकडे अद्यापही गांभीर्याने पाहत नाही. मराठा समाजातील अनेक तरुण तरुणी नौकरी अभावी बेकारीमध्ये पडून आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने याची दखल घेवून आरक्षण प्रश्न निकाली काढावा अशी मागणी यावेळी खा.सौ. रजनीताई पाटील यांनी केली यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर व त्यांच्या कारभारावर चांगलेच टिकास्त्र सोडले. केंद्र सरकार हे जुमलेबाज सरकार आहे आत्ताच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जनतेने भाजपा विरोधी कौल दिलेला आहे. मोदी केवळ भाषण करून लोकांना स्वप्न दाखवत आहेत प्रत्यक्षात मात्र काहीच नाही त्यामुळे जनतेच्या हे सर्व लक्षात आले असून आगामी काळात जनता आता याहीपेक्षा वाईट हाल भाजपाचे करतील अशा तीव्र शब्दात त्यांनी भाजपा व केंद्र सरकारवर हल्ला चढवला. केंद्र सरकार फक्त योजनांची घोषणा करण्यात अग्रेसर आहे मात्र त्याची अंमलबजावणी शून्य आहे गजनी चित्रपटासारखी केंद्र सरकारची कार्यपद्धती आहे पुन्हा त्यांच्या लक्षातच राहत नाही.

एकीकडे राज्याचा विकास हाच देशाचा विकास असल्याचे राषट्रपती यांनी आपल्या भाषणात म्हटले मग महाराष्ट्रातील सोळा ते सतरा उद्योग महाराष्ट्रातून गुजरातला हलवले हा महाराष्ट्राचा विकास आहे का ? आपल्याला महाराष्ट्रातील जनतेची फक्त मतच हवी आहेत का ? असा सवालही त्यांनी यावेळी उपस्थित केला. ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप भाजपचे नेते करतात त्यांनाच पुन्हा सोबत घेऊन वॉशिंग मशीन मद्ये घालून स्वच्छ करतात महाराष्ट्रात देखील असेच फोडाफोडीचे राजकारण केले आणि याचा लोकांत तीव्र संताप आहे. ७५ वर्षाच्या काळात देशासाठी काँग्रेस पक्षाचे असणारे योगदान नाकारून चालणार नाही देशातील जनतेला माहित आहे काँग्रेसचे योगदान काय आहे ते त्यामुळे आपण केवळ काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावर टीका करण्याशिवाय काहीही करू शकत नाहीत हे आता देशातील जनतेला समजल आहे. देशातील गरीब लोक आजही महागाई चा संघर्ष करत आहेत तरुण लोक नौकरीसाठी आक्रोश करत आहेत. अशा शब्दात खा. रजनीताई पाटील यांनी सरकारला खडे बोल सुनावले.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस.पी. वानखडे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ४६१/२०२४**

**मनिषा भ्र. चंद्रकांत सानप व इतर विरूध्द निरंक**

**(मार्फत ॲड. व्ही. एस. मिसाळ, गेवराई)**

ज्याअर्थी मयत **नामे चंद्रकांत पि. माणिक सानप** हे/हया दिनांक ०८/०८/२०१९ रोजी मौजे गढी, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार १) मनिषा भ्र. चंद्रकांत सानप, वय ३९ वर्षे, रा. गढी, ता. गेवराई, जि. बीड, २) वैष्णवी पि. चंद्रकांत सानप, वय १७ वर्षे, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, रा. सदर, ३) साक्षी पि. चंद्रकांत सानप, वय ०८ वर्षे, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क्र. १, रा. सदर यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत चंद्रकांत पि. माणिक सानप यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**आज दिनांक २२/०६/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख ३०/०७/२०२४**

**स्वाक्षरित**
**क. लिपीक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई**

शिक्का

**आदेशावरुन**
**स्वाक्षरित**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई**

# माजलगाव - तेलगाव रस्ता रुंदीकरणाचा मार्ग मोकळा

## धारूर घाट रुंदीकरण, माजलगाव बायपास रस्ता रुंदीकरण आणि संभाजी महाराज चौक ते सिंदफना नदीच्या पुलापर्यंत ड्रेनेज लाईनचा मार्ग होणार मोकळा

**माजलगांव । प्रतिनिधी**

तालुक्यातून एन.एच.५४८ सी.हा राज्य महामार्ग जात असून या महामार्गावर अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. माजलगाव ते तेलगाव रस्त्यामध्ये मोठ-मोठ्या भेगा पडल्यामुळे अनेक अपघात झाले आहेत.यामध्ये अनेकांनी जीव गमवला आहे. तसेच माजलगाव शहरातून जाणाऱ्या महामार्गाला ड्रेनेजची व्यवस्था नसल्यामुळे पावसाळ्यात अनेक ठिकाणी रस्त्यावर पाणी साचत आहे व कित्येक दुकानदारांच्या दुकानामध्ये पाणी शिरत आहे.याच प्रमाणे धारूर घाटा मध्ये होणारे अपघात पाहता या घाटाचे रुंदीकरण आणि माजलगाव बायपास रस्त्याचे



**भाजपा नेते मोहनराव जगताप यांच्या मागणीला यश**

> रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय भारत सरकार यांनी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांना या महामार्गाची व्यवहार्यता तपासण्याचे आणि रस्ते वाहतूक महामार्ग मंत्रालय यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत.

रुंदीकरण करण्याची आवश्यकता असल्याने भारतीय जनता पार्टीचे नेते माजलगाव विधानसभा निवडणूक प्रमुख मोहनराव जगताप यांनी केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी हे माजलगाव येथे लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी आले असता त्यावेळी त्यांना या रस्त्या समस्येबाबत कळविले होते व या बाबत निवेदन दिले होते.याची दाखल घेऊन नितीन गडकरी यांच्या मार्फत बाळासाहेब ठेंग सल्लागार रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय भारत सरकार यांनी मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई यांना या महामार्गाची व्यवहार्यता तपासण्यासाठी आणि रस्ते वाहतूक महामार्ग मंत्रालय यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे लवकरच या महामार्गावरील समस्या दूर होण्याचे संकेत मिळाले आहेत.या महामार्गाची दखल घेतल्यामुळे मोहनराव जगताप यांनी नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

# भर वस्तीत चाकूने भोसकून पत्नीवर प्राणघातक हल्ला; आरोपीला जामीन मंजूर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पतीच्या दारू पिण्याच्या सवयीला कंटाळून पत्नीने घर घर सोडले आणि खाजगी नोकरी करू लागली. या रागातून आणि संशयातून पतीने भरवस्तीत चाकूने भोसकून तिच्यावर प्राणघातक हल्ला केला होता. दोन महिन्यापूर्वी झालेल्या या घटनेतील आरोपी पतीला अंबाजोगाई जिल्हा व सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आरोपीच्या वतीने ॲड. कमलकिशोर पारीख यांनी न्यायालयात प्रभावी युक्तिवाद केला.




अधिक माहिती अशी की, अंबाजोगाई येथील मयूर बाबुलालजी शर्मा हा मागील पाच-सहा वर्षापासून दारूच्या आहारी गेला होता. त्या कारणाने त्याचा सतत पत्नीशी वाद होत होता. सततच्या वादाला कंटाळून पत्नी त्याला सोडून निघून गेली होती. स्वतःची उपजीविका भागविण्यासाठी पत्नी खाजगी नोकरी करू लागली. पत्नी खाजगी नोकरी करत असल्याचा रागाने व संशयाने ३० एप्रिल रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास शहरातील अंबिका वसाहतीतील मंदिराशेजारी चाकूने तिच्या पोटात भोसकून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. सदर आशयाच्या फिर्यादीवरून मयूर शर्मा याच्यावर कलम ३०७ अन्वये अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा (गु.र.नं. १८८/२०२४) नोंदवण्यात आला. पोलिसांनी आरोपीला अटक करून न्यालयात हजर केले असता त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली. त्यानंतर आरोपीने ॲड.कमलकिशोर पारीख यांच्या मार्फत न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला. न्यायालयासमोर याबाबत सुनावणी झाली असता आरोपीच्या वकिलांचा प्रभावी युक्तिवाद लक्षात घेत जिल्हा व सत्र न्या. घरत मॅडम यांनी आरोपीस जामीन मंजूर केला. याप्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड. कमलकिशोर पारीख यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. अक्षय कामळे व ॲड. सुरेखा शिंदे यांनी सहकार्य केले.

# आ.बाळासाहेब आजबे यांच्या प्रयत्नाने आष्टी उपजिल्हा रुग्णालयाच्या कामास ८८ कोटी रु प्रशासकीय मान्यता प्रदान

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणी वर्धित करून उपजिल्हा रुग्णालयास मान्यता काही दिवसांपूर्वी मिळाली होती या उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारत बांधकामाससाठी ८८कोटीलक्ष रुपयेच्या कामास प्रशासकीय मान्यता आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या प्रयत्नाने आज अखेर मिळाली आहे.आष्टी उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असून हि प्रशासकीय मान्यता दिल्याबद्दल मतदार संघाच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री अजित दादा पवार उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस साहेब आरोग्यमंत्री तानाजी सावंत ,पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे



आभार मानतो असे आमदार बाळासाहेब आजबे यांनी सांगितले .

पुढे बोलतानाआष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे काका म्हणाले की गेली दोन वर्षांपासून आपण या कामासाठी पालकमंत्री धनंजय मुंढे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न केले त्यास काही दिवसापूर्वी महाराष्ट्र शासनाने आष्टी येथे उपजिल्हा रुग्णालयास मंजुरी दिली होती या मंजुरीस आज खऱ्या अर्थाने मूर्त स्वरूप आले असून महाराष्ट्र शासनाने उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी ८८ कोटी ३४ लक्ष रुपये किमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून या कामी आपण वेळोवेळी पाठपुरावा केला होता आष्टी येथील उपजिल्हा रुग्णालय इमारत ही भव्य दिव्य स्वरूपामध्ये आष्टी बेलगाव रोडवरील प्रशस्त जागेमध्ये होणार आहे या उपजिल्हा रुग्णालयामध्ये सर्वसोई युक्त अशी व्यवस्था असणार आहे त्यामुळे आता आष्टी तालुक्यातील जनतेला अहमदनगर व बीड या ठिकाणी उपचारासाठी जाण्याची वेळ येणार नाही उपजिल्हा रुग्णालय व्हावे असे आपले स्वप्न होते या कामासाठी आपण शासनाकडे वेळोवेळी प्रयत्न केले होते त्याला आज यश आल्याने मनस्वी आनंद होत आहे असे शेवटी आमदार आजबे सांगितले.

# मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा महिला भगिनींनी लाभ घ्यावा

## सेतू सुविधा केंद्र आणि महसूल यंत्रणेकडून सहकार्य अपेक्षित -सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे या योजनेचा लाभार्थी महिला भगिनींनी लाभ घ्यावा.शिवाय या योजनेसाठी गावोगावी सुरेश धस मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी महिला भगिनींना अडचण येऊ नये यासाठी मदत केंद्र उभारले आहेत.मात्र सेतूसुविधा केंद्रचालक व महसूल प्रशासन यंत्रणेकडून या महत्वपूर्ण कामासाठी सहकार्य व्हावे अशी अपेक्षा माजीमंत्री सुरेश धस यांनी व्यक्त केली आहे.



या योजनेबाबत सांगताना धस यांनी आवाहन केले आहे की, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची मोठी घोषणा या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राज्य सरकार कडून करण्यात आली. अत्यंत चांगली योजना राज्य सरकारने सुरू केली असून या योजनेचा सर्व महिला भगिनींनी लाभ घ्यावा त्याचबरोबर दि.३१ ऑगस्ट पर्यंत या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑफलाईन अर्ज प्रक्रिया करण्यात यावी.मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतील लाभार्थी महिलांना दरमहा १५००/रू. रुपये मिळणार आहेत.महिलांना ही योजना कमीत कमी खर्चात कशी मिळेल यासाठी आष्टी,पाटोदा शिरूर तालुक्यातील तहसीलदार यांनी यावर कटाक्षाने नजर ठेवत अल्प खर्चामध्ये या योजनेचे कागदपत्र महिलांना उपलब्ध होतील यासाठी मदत करावी तसेच या योजनेबाबत ग्रामीण भागासह अनेक ठिकाणी सुरेश धस मित्र मंडळाच्या वतीने मदत केंद्रांची उभारणी केलेली असून जास्तीत जास्त महिला भगिनींनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले आहे.

### मदत केंद्र सुरु

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या लाभ घेण्यासाठी आष्टी ,पाटोदा,शिरूर तालुक्यातील सर्व मतदार संघातील गावोगावी सुरेश धस मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी मदत केंद्र सुरू केले या योजनेबाबत आर्थिक नुकसान व लूट होऊ नये यासाठी हे मदत केंद्र असणार असून प्रशासनाच्या कागदपत्रासाठी येणाऱ्या अडचणी बाबत या मदत केंद्रात मार्गदर्शन करण्याचे काम कार्यकर्ते करतील असेही सुरेश धस यांनी सांगितले.

### अटी शिथिल

पूर्वीच्या आदेशामध्ये या योजनेचा लाभ एकत्रित कुटुंबातील पाच एकर पेक्षा जास्त जमीन नसावी असे होते परंतु ही एक अट आता शिथिल करण्यात आले असून वयाची मर्यादा देखील २१ वर्ष ते ६५ वर्षापर्यंत करण्यात आलेली असून राज्यातील अधिवासाबाबत देखील अट शिथिल करण्यात आलेली आहे.

# पशुसंवर्धन खात्यातील डॉ.गदादे, डॉ.साबळे यांना पदोन्नती

**म्हसोबावाडी। प्रतिनिधी**

पशुसंवर्धन खात्यामध्ये कार्यरत असणारे तालुक्यातील भाळवणी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात असलेले डॉ.सुनिल गदादे व धामणगाव येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात असलेले डॉ.विष्णू साबळे यांना सहाय्यक पशुधन विकास अधिकारी



या पदावर गुरूवार दि २७ जून२०२४ रोजी शासनाच्या जेष्ठ ते यादी प्रमाणे पदोन्नती मिळाली असून अनुक्रमे पशुवैद्यकीय दवाखाना धानोरा आणि पशुवैद्यकीय दवाखाना धामणगाव या ठिकाणी पदस्थापना मिळाली आहे.

दोघेही पशुसंवर्धन खात्यामध्ये वीस वर्षापासून कार्यरत असून ते चांगली सेवा देत आहेत. विविध योजनेच्या माध्यमातून पशुपालकांना लाभ मिळवून देण्याचे काम तसेच लंपी सारख्या साथ रोगामध्ये चांगल्या पद्धतीचे काम त्यांनी केलेले होते. त्यांच्या या पदोन्नतीमुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# पोलीस असल्याचे सांगत ३ लाखाची चोरी

**परळी । प्रतिनिधी**

पोलीस असल्याचे सांगत हातोहात तीन लाख रुपये लंपास केल्याची घटना परळी तालुक्यातील चांदापूर रोडवर घडली.या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार गंगाखेड तालुक्यातील डोंगरजवळा येथील रहिवासी असलेल्या सुरेश केरबा मुंडे यांनी जमीन व्यवहारासाठी ठेवलेले तीन लाख रुपये परळी तालुक्यातील चांदापुर येथील इवाई माधव गित्ते यांना उसने देण्यासाठी जात असताना चांदापूर रोडवर असलेल्या मंगल कार्यालयाजवळ दोन अनोळखी इसमाने पाठलाग करून आम्ही पोलीस आहोत असे सांगत झाडाझडती घेत पत्नीच्या पर्स मध्ये असलेले तीन लाख रुपये घेऊन फरार झाले. या प्रकरणी सुरेश मुंडे यांच्या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलिसात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केरळच्या सिंधू पणीकर (नवगिरे) यांना आंतरभारतीचा स्नेहसंवर्धन पुरस्कार

**आंबाजोगाई । प्रतिनिधी**

दर वर्षी १५ ऑगस्ट रोजी दिला जाणारा आंतरभारतीचा स्नेहसंवर्धन पुरस्कार यंदा केरळची कन्या सिंधू पुरुषोथमन पणीकर (नवगिरे) यांना दिला जाणार आहे.



अन्य प्रांतातून येऊन आंबाजोगाईत वास्तव्य करणाऱ्या व आंबाजोगाईच्या गौरवात भर टाकणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो.

श्रीमती सिंधू ह्या केरळच्या कोट्यायम जिल्ह्यातल्या. बी एस्सी नरसिंग करून आंबाजोगाईत आल्या. सुरुवातीला मानवलोक मध्ये काम केले. नंतर एम आय टीत सेवा दिली. तेथेच मारुती नवगिरे यांचा परिचय झाला. त्यांनी आंतर प्रांतीय व मानवी विवाह केला. पुढे त्यांनी बी एड करून एम आय टीच्या सरस्वती विद्यालयात सहशिक्षिकेची नोकरी पत्करली. श्रीमती सिंधू यांनी इंग्रजीत एम ए केले आहे. त्यांची दोन्ही मुले पुण्यात शिक्षण घेत आहेत.

केरळची कन्या आंबाजोगाईची सून आहे म्हणून तिचा सन्मान करणे आंबाजोगाईकरांचे कर्तव्य ठरते. याच भावनेने हा पुरस्कार दिला जात आहे.

मानकरी

२०१४ला प्राचार्य बी आय खडकभावी यांचा सन्मान करून स्नेहसंवर्धन पुरस्कार सुरू करण्यात आला होता. त्यानंतर मनीष स्वीटचे शशिकांत रूपडा (गुजरात), प्राचार्य महावीर शेट्टी (कर्नाटक), मेवाडचे शंकरजी मेहता (राजस्थान), आनंदराव अंकम (तेलंगण), उडपी हॉटेलच्या सुशीलाताई शेट्टी (कर्नाटक), सिमेंटच्या वस्तूंचे निर्माते शेख शमीम (उत्तर प्रदेश), लाकडी काम करणारे राजू जागींड (राजस्थान), टायर रिमोल्ड करणारे अजिथकुमार कुरूप (केरळ), वाचमनचे काम करणारे नरपती कुंजेडा (नेपाळ) यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

एकमेव शहर

अन्य प्रांतातून येऊन स्थायिक झालेल्या व शहराच्या गौरवात भर घालणाऱ्या व्यक्तीचा सन्मान करण्याची परंपरा आंबाजोगाईने सुरू केली आहे. या मागे 'हम सब एक हैं' ही राष्ट्रीय एकात्मतेची भावना बळकट करण्याचा विचार आहे.

# आष्टी विधानसभेसाठी जनतेला कोणता हवा चेहरा...?

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

विधानसभेचा आष्टी मतदार संघ तीन तालुक्याचा मिळून बनलेला आहे. त्यामध्ये आष्टी, पाटोदा हे दोन पूर्ण तालुके येत असून शिरूर तालुक्याचा काही भाग येतो. लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाच्या ताईंना या मतदारसंघाने सुमारे ३२ हजार मतांचे मताधिक्य मिळाले .यावेळी ताईच्या बाजूने सर्व प्रस्थापित म्हणजे माजी आमदार भीमराव धोंडे, आमदार बाळासाहेब आजबे, विधान परिषदेचे आमदार सुरेश धस व अनेक लहान मोठे सत्ताधारी कार्यकर्ते होते. नवनिर्वाचित खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या बाजूने प्रस्थापिता पैकी माजी आमदार साहेबरावजी दरेकर नाना हे एकमेव होते. परंतु जनता मात्र पूर्णपणे सत्ताधाऱ्यांच्या विरोधात होती.

ताईंना मताधिक्य मिळाले असले तरी त्यामध्ये वाटेकरी अनेक जण आहेत . विधानसभा



निवडणुकीच्या वेळी हे सर्वजण आपापल्या मार्गाने जाणार आहेत? अर्थात ते आपली वेगवेगळी चूल मांडणार आहेत. त्यामुळे या प्रस्थापितांना जनता पुन्हा संधी देणार नाही असे चित्र आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदार संघाचे आहे.

इच्छुक कोण कोण आहेत?

या प्रश्नाला उत्तर देताना समोर येते की, माजी मंत्री सुरेश धस ,माजी आमदार भीमराव धोंडे हे दोघे भारतीय जनता पक्षाकडून इच्छुक असून महायुती मधील विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे हेही आपला हक्क सोडणार नाहीत . तसेच शरद पवार यांचे कट्टर समर्थक साहेबराव दरेकर हेही इच्छुक आहेत. माजी जिल्हा परिषद सदस्य तथा युवा नेते सतीश शिंदे हेही आष्टी विधानसभा लढवण्यासाठी इच्छुक आहेत. याशिवाय आष्टी तालुका मराठा सेवा संघाचे सामाजिक काम व आदरणीय मनोज दादा जरांगे पाटील फॅक्टर यामुळे आष्टी विधानसभेसाठी अनेक नवीन चेहरे इच्छुक झालेले आहेत.

महायुतीकडून सुरेश धस, भीमराव धोंडे, आ. बाळासाहेब आजबे, सतीश शिंदे या चार जणांपैकी एकाला तिकीट मिळेल. इतर तिघे काय करणार?हाही मोठा प्रश्न आहे. दरेकर नाना जागा पकडण्यासाठी रुमाल टाकून बसले असले तरी ऐनवेळी पकडलेली जागा ते दुसऱ्यालाही देऊ शकतात! मराठा आरक्षणाचा विषय समाधानकारकपणे मीटवला नाही तर नवीन चेहऱ्यामधून एखाद्याला संधी मिळू शकते. असा अंदाज जनतेमधून काढला जात आहे.

# बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नवे कार्यालय सुरू

## लवकरच पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्यासह नेत्यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील के.एस.के. कॉलेज रोडलगत मित्र नगर चौकात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे भव्य असे सुसज्ज नवीन कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाचे लवकरच पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्यासह आमदारांच्या हस्ते उद्घाटन होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण यांनी दिली. त्यांनी नूतन कार्यालयात मंगळवारी (दि.२) जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांचा आढावा घेतला. यावेळी ॲड.चव्हाण हे बोलत होते.




व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, बीड जिल्हा महिला आघाडी निरीक्षक वैशालीताई पाटील, रा.काँ.चे प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार, महिला आघाडीच्या प्रदेश सचिव संगीताताई तुपसागर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा ॲड.प्रज्ञाताई खोसरे, जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष शेख एकबाल निसार अहेमद, युवक जिल्हाध्यक्ष सुशांतसिंह पवार, परळी विधानसभा अध्यक्ष गोविंद देशमुख, कार्यालयीन चिटणीस महादेव धांडे, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष विजय धायगुडे,

### गद्दारी करणाऱ्यांना जनता धडा शिकवेल : डॉ.योगेश क्षीरसागर

महायुती सरकारकडून कोट्यवधींचा निधी मिळवायचा, विविध लाभ घ्यायचे आणि ऐन निवडणुकीत गद्दारी करायची हे गंभीर आहे. काही नेत्यांनी पंकजाताई मुंडे यांच्यासोबत लोकसभा निवडणुकीत गद्दारी केली. त्यांना आता जनता धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली. पुढे बोलताना ते म्हणाले, आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने आम्ही कामाला लागलो. सर्वांनी एकदिलाने काम केल्याशिवाय यश मिळणार नाही. पक्षातील नेत्यांची मान उंचावायची असेल तर पूर्ण क्षमतेने काम करावे अन्यथा वेळ निघून गेल्यावर दुःख व्यक्त करून उपयोग होणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले. दरम्यान, नूतन कार्यालयात आपण नेहमी थांबणार असून जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# पोलीस पाटील यांची रिक्त पदे तात्काळ भरा

## प्रा.ईश्वर मुंडे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस पाटील हे गाव गाडयातील मान सन्मानाचे तसेच शांतता-सुव्यवस्था टिकवून ठेवत पोलीस प्रशासन व जनता या मध्ये समन्वय ठेवणारे महत्वाचे पद आहे.




महाराष्ट्रासह बीड जिल्ह्यातील बहुतांशी पोलीस पाटील यांची पदे विविध कारणांनी रिक्त झालेली आहेत. सदरील पदे अनेक वर्षा पासून रिक्तच आहेत.या मुळे गावगाडयात एक पोकळी निर्माण झालेली आहे.

तरी बीड जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही तात्काळ करून ही पदे लवकरात लवकर भरावीत असे लेखी निवेदन प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे,राज्य प्रमुख, सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी विभाग, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांनी मा. अविनाश पाठक,जिल्हाधिकारी,बीड यांना दिले आहे. सदरील मागणीच्या निवेदनास सकारात्मक प्रतिसाद देत पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्याबाबत जलद गतीने कार्यवाही करून ही पदे लवकरात लवकर भरू असे अश्वासन मा.अविनाश पाठक जिल्हाधिकारी,बीड यांनी दिले असल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी प्रसिध्दी माध्यमांना सांगितले आहे.या वेळी सोबत श्रीराम मुंडे, प्रदेश प्रवक्ते,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष भटके विमुक्त विभाग हे होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अजित पवारांना बालेकिल्ल्यातच खिंडार;

## दोन युवा नेत्यांच्या हाती तुतारी, गळ्यात राशपचा गमछा

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्येही फूट पडली. अजित पवारांसोबत जास्तीत जास्त आमदार गेले, तर शरद पवारांनी मोजक्याच आमदारांना सोबत घेऊन लोकसभेची खिंड लढवली. नुकतेच झालेल्या लोकसभा निवडणुकीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने १० जागा लढवल्या, त्यापैकी ८ जागांवर तुतारी चिन्हावरील राष्ट्रवादीचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ४ पैकी एकच उमेदवार खासदार बनला आहे. त्यामुळे, साहजिक शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील नेत्यांचा उत्साह वाढला आहे. त्यातच, आता अजित पवारांचा (-क्षळीं झुरी) पिंपरी चिंचवडमधील दोन युवा नेत्यांनी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे.

अजित पवार गटाचे पिंपरी-चिंचवडचे विधानसभा अध्यक्ष आणि माजी शहर युवक अध्यक्षांनी राष्ट्रवादी काँग्रेसला धक्का देत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तसेच माजी शहर युवक अध्यक्ष विशाल वाकडकर आणि पिंपरी-चिंचवड विधानसभा अध्यक्ष विशाल काळभोर यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात शेकडो कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. मुंबईत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. तत्पूर्वी मुंबईत या दोन्ही पदाधिकाऱ्यांनी जयंत पाटील यांच्यासमेवत चर्चा केली होती.



विशाल वाकडकर यांची मे २०२२ मध्ये म्हणजेच राष्ट्रवादी पक्ष एकच असताना राष्ट्रवादीच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड झाली होती. त्यावेळी, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हेच होते. मात्र, राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर वाकडकर हे अजित पवारांसमवेत गेले होते. आता, लोकसभा निवडणुकांनंतर आगामी विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी आणि राजकीय वातावरण लक्षात घेत वाकडकर यांनी पुन्हा एकदा शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत राहून तुतारी वाजवण्याचं ठरवलं आहे. त्यानुसार, मुंबईतील राष्ट्रवादीच्या पक्ष कार्यालयात पिंपरी चिंचवडमधील दोन्ही नेत्यांचा पक्षप्रवेश झाला. अजित पवारांसाठी बालेकिल्ला असलेल्या पिंपरी चिंचवडमध्येच राष्ट्रवादीला खिंडार पडल्याने आगामी विधानसभा निवडणुकांपर्यंत काय-काय होईल, याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला घवघवीत यश मिळालं असून अजित पवारांच्या राष्ट्रवादीला केवळ १ जागा जिंकता आली. नुकतेच झालेल्या विधानपरिषद निवडणुकीतही अजित पवारांच्या राष्ट्रवादीला पराभवाचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे, राष्ट्रवादीतील अनेक आमदार व पदाधिकारी आमच्या संपर्कात असल्याचा दावा शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून केला जातो. यापूर्वी आमदार रोहित पवार यांनी असा दावा केला होता.

# बारामतीत सापडली गंजलेली पाच पिस्तुले



**बारामती । प्रतिनिधी**

बारामती शहरातील महात्मा फुले साठवण तलावानजीक शहर पोलिसांना गंजलेल्या अवस्थेतील पाच पिस्तुले मिळून आल्याने शहरात एकच खळबळ उडाली. कोणीतरी ही पिस्तुले पुरून ठेवली असावीत, असा कयास बांधला जात आहे. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात पोलिस अंमलदार सचिन आबासो कोकणे यांनी फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरोधात भारतीय शस्त्र अधिनियमानुसार गुन्हा दाखल करीत तपास सुरू केला आहे.

काय आहे प्रकरण?

सोमवारी (दि. १) दुपारी पावणेचार वाजेपूर्वी महात्मा फुले साठवण तलावाच्या पश्चिमेकडील बाजूस इनलेटच्या लोखंडी पाइपजवळ ही पिस्तुले सापडली.

### पोलिसांनी अज्ञाताविरोधात भारतीय शस्त्र अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला

या पिस्तुलांना प्लास्टिक हँडग्रिप असून, त्यामध्ये निळ्या रंगात स्टारचे चिन्ह आहे. या पाचपैकी दोन पिस्तुलांत मॅगझिन आहेत, तर अन्य पिस्तुलांत मॅगझिन नाहीत. एक टी-शर्ट पोलिसांना तेथे सापडला असून, त्यावर इंग्रजी अक्षरांत फिशर असे लिहिले आहे.

पिस्तुलांविषयी

या पाच पिस्तुलांची किंमत पोलिसांनी प्रत्येकी पाच हजार रुपये याप्रमाणे फिर्यादीत दाखवली आहे. अज्ञाताने स्वतःच्या फायद्यासाठी बेकायदेशीररीत्या पाच लोखंडी गावठी पिस्तुले बाळगून त्या ठिकाणी टाकून दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# वारकऱ्यांना एक टन पिठलं आणि एक लाख भाकरीची मेजवानी

**यवत (पुणे) । प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना भोजनासाठी परंपरेनुसार पिठलं भाकरीचा जोरदार बेत यवतकरांनी बुधवारी आखला आहे. एक टन पिठलं आणि एक लाख भाकरी अशा स्वरूपाची ही मेजवानी असणार आहे.

गेल्या ८० वर्षापासून या ठिकाणी पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना पिठलं भाकरी करण्याची परंपरा यवत (पुणे) ग्रामस्थांनी जोपासली आहे. पालखी सोहळा सायंकाळी यवत गावातील काळ भैरवनाथ मंदिरात मुक्कामी दाखल झाल्यानंतर मंदिर परिसरातच वारकऱ्यांना पिठलं भाकरी वाटप करण्यात येते. या ठिकाणी बुधवारी (दि.३) रोजी सकाळपासूनच ग्रामस्थांची पिठलं भाकरी बनवण्याची



लगबग सुरू केली आहे.

मंदिर परिसरात एक टन पिठलं बनवलं जातं तसेच दहा हजाराच्या आसपास भाकरी देखील याच ठिकाणी बनविल्या जातात. तर उर्वरित भाकरी यवत परिसरातील वाड्यावस्त्यांवरील महिला बनवून त्या पालखी सोहळा गावात येण्यापूर्वीच घरातील कुटुंब प्रमुख या ठिकाणी आणून देतात. पिठलं भाकरी बनवण्यासाठी गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या बरोबर युवक देखील सहभागी होतात. सकाळपासूनच कांदा चिरणे, मसाले एकत्र करणे, बेसन भिजवणे यासाठी ग्रामस्थ कष्ट घेताना दिसतात.

लोणी काळभोर ते यवत असा मोठा पल्ला पार करुन आल्यानंतर या ठिकाणचे पिठलं आणि भाकरी खाण्यासाठी वारकरी मंडळी गर्दी करत असतात. वारकऱ्यांच्या बरोबर पालखी सोहळा काळात बंदोबस्ताला असणारे पोलीस अधिकारी कर्मचारी व विविध विभागाचे सरकारी कर्मचारी या ठिकाणी पिठलं- भाकर खाण्यासाठी आवर्जून येत असतात. या ठिकाणच्या पिठलं भाकरीबद्दल माहिती देताना ग्रामस्थ सांगतात की, एरव्ही आपण घरी बनवलेल्या पिठलं भाकरी पेक्षा या ठिकाणी बनवलेल्या भाकरीची चव खूपच स्वादिष्ट असते. त्यामुळे वारकऱ्यांना वाटप केल्यानंतर ग्रामस्थ देखील या पिठलं-भाकरीचा आस्वाद घेतात. या ठिकाणच्या चवीला कालभैरवनाथ तुकाराम महाराज आणि विठ्ठलाची कृपा असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

# उरुळी कांचनमध्ये संत तुकाराम महाराज पालखी नियोजनावरुन ग्रामस्थ संतप्त; नगारा बैलगाडा रोखून धरला

**उरुळी कांचन । प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात पालखी सोहळा विश्वस्तांनी केलेल्या बदलांनी उरुळी कांचन (ता. हवेली) येथील ग्रामस्थांनी पालखी सोहळ्याचा रथापुढील नगारा बैलगाडा आडविण्याचा प्रयत्न केला. यावेळी संतप्त ग्रामस्थांची पालखी विश्वस्त व पोलिसांत मोठी वादावादी घडून विश्वस्तांच्या निषेधाबाबत घोषणाबाजी झाली.

लोणी काळभोरचा मुक्काम उरकून उरुळी कांचन येथे संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याची विसाव्याची परंपरा आहे; मात्र पालखी सोहळा विश्वस्तांनी पालखी सोहळ्यात यंदाच्या वर्षी बदल करुन पालखी सोहळ्याचे नियोजन महात्मा गांधी विद्यालयात केले होते. या नियोजनास ग्रामस्थांचा विरोध होता. असे असताना बुधवारी (दि. ३) पालखी सोहळा उरुळी कांचन गावात प्रवेश केल्यानंतर ग्रामस्थांनी पुणे-सोलापूर महामार्गावर पालखी सोहळा पारंपारिक रिवाजाने गावाला प्रदक्षिना घालून मार्गस्थ करावा अशी मागणी केली; मात्र



त्याला विश्वस्तांनी विरोध केल्याने ग्रामस्थांनी नगारा रथ अडवून धरला.

या प्रकारानंतर ग्रामस्थांची पोलिस प्रशासन व विश्वस्तांशी वादावादी होऊन विश्वस्तांनी नगारा बैलगाड्याचे बैल सोडून विरोध दर्शविला. या वादानंतर पोलिसांनी पालखी सोहळा हॉटेल एलाईट चौकातून काढून पुढे मार्गस्थ केला. त्यानंतर पालखी विश्वस्तांनी पालखी सोहळा विसावा न घेता यवत मुक्कामी दिशेने रवाना केला. दरम्यान या प्रकाराने मोठा गोंधळ उडाला आहे. ग्रामीण पोलिस अधिक्षक पंकज देशमुख यांच्यासमोरच पोलिसांची वादावादी उडाली. ग्रामस्थांनी विश्वस्तांच्या निर्णयावर गावात निषेध सभा घेऊन पालखी विश्वस्तांचा धिक्कार केला.


# जबाबदार आणि सुरक्षित पर्यटनावर भर द्या-जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे

**पुणे । प्रतिनिधी**

पर्यटनस्थळांवर पर्यटकांच्या सुरक्षेच्यादृष्टीने आवश्यक उपाययोजना करून याठिकाणी कोणतीही जीवित हानी होणार नाही याची दक्षता विविध यंत्रणांनी घ्यावी. जबाबदार आणि सुरक्षित पर्यटनावर अधिक भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आपत्ती व्यवस्थापनाबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी विठ्ठल बनोटे आदी उपस्थित होते.

डॉ.दिवसे म्हणाले, येत्या काळात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर अपघात प्रवण क्षेत्रांची माहिती एकत्रित करावी. दरडी कोसळणे, पूल पाण्याखाली जाणे अशा घटनांची शक्यता असलेल्या ठिकाणची वाहतूक वेळीच बंद करावी. पर्यटनाच्यादृष्टीने धोकादायक ठिकाणी पर्यटकांना बंदी करावी. कोणतेही पर्यटक सायंकाळनंतर वनक्षेत्रात राहणार नाही याची दक्षता घ्यावी. पर्यटकांकडून नियमांचे




पालन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे. कृषी पर्यटन केंद्रावरही सुरक्षेच्या नियमांचे पालन होईल यादृष्टीने सूचना द्याव्यात.

प्रेक्षणीय ठिकाणी गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाय योजावेत. गडकिल्ले आणि वनक्षेत्रात पर्यटन व्यवसाय करणाऱ्या संस्थांकडून त्यांच्या समवेत येणाऱ्या पर्यटकांची माहिती घ्यावी. अशा ठिकाणी सुट्टीच्या दिवशी बचाव पथके तयार करण्यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि पथकांची मदत घ्यावी. त्यांना आवश्यक साधनसामुग्री द्यावी. एनडीआरएफच्या संपर्कात राहून कोणतीही जीवित हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी. मावळ, मुळशी, भोर, वेल्हा यासह ग्रामीण भागात सर्पदंशाच्या लशी उपलब्ध असल्याबाबत खात्री करावी. जिल्हा आणि तालुका स्तरावर २४ तास नियंत्रण कक्ष सुरू ठेवावे.

रस्ता सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात. अनधिकृत जाहिरात फलकाचे सांगाडेही तात्काळ दूर करावेत. महापालिका क्षेत्रात जुन्या इमारती, पूरप्रवण क्षेत्र आणि वाहतुकीच्यादृष्टीने अडचणीच्या क्षेत्रांची माहिती घ्यावी आणि त्याठिकाणी आवश्यक उपाययोजना निश्चित कराव्यात. जलाशयात मासेमारीसाठी बोटींना परवानगी दिली असल्यास या बोटींचा पर्यटन किंवा प्रवासासाठी उपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी. सर्व यंत्रणांनी जीवित हानी रोखण्याचा संकल्प करावा, असे आवाहन डॉ.दिवसे यांनी केले.

# औद्योगिक, घरगुती पाणीपट्टीत दहा टक्के वाढ

पुणे : राज्यातील औद्योगिक तसेच घरगुती पाणीपट्टीत तब्बल दहा टक्के दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार वाढविण्यात आलेल्या दराची अंमलबजावणी १ जुलैपासून लागू करण्यात आलेली आहे.

त्यानुसार घरगुती वापरासाठी प्रति हजार लिटरला ०.६ ते ०.१२ पैसे, औद्योगिक प्रक्रिया उद्योगांना १.२१ रुपये ते २.४२ रुपये आणि कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना १८.१५ ते ३६.३ रुपये वाढ करण्यात आली आहे. मात्र, आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेता यापैकी केवळ उपसा सिंचन म्हणजेच शेतीसाठीच्या पाणीपट्टी वाढीला स्थगिती देण्यात आली आहे.

जलसंपदा विभागाकडून राज्यातील पाणीपट्टीत २०२२ मध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या दरात २०२४-२५ या जलवर्षांसाठी दहा टक्के वाढ करण्यात येणार होती. त्यानुसार १ जुलै २०२४ पासून ही दरवाढ लागू करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून राज्यातील सर्व घरणांमधून वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे दर ठरवण्यात येतात. त्यानुसार जलसंपत्ती प्राधिकरणाकडून फेब्रुवारी २०२२ मध्ये राज्यातील घरगुती आणि औद्योगिक पाणीवापराचे दर प्रस्तावित करण्यात आले होते. या दरांबाबत हरकती, सूचना मागवण्यात येऊन नवे दर एप्रिल महिन्यात निश्चित करण्यात आले आणि त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे.

हे दर ठरविताना २०२३-२४ आणि २०२४-२५ या आर्थिक वर्षांत प्रत्येकी दहा टक्के वाढ प्रस्तावित करण्यात आली होती. मंजूर कोटयापेक्षा १०० ते १२५ टक्के जादा पाणीवापर केल्यास महापालिकांना अनुज्ञेय दराच्या दीडपट, १२५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीवापर केल्यास तिप्पट दर आकारण्यात येणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी सांडपाणी नैसर्गिक प्रवाहात किंवा कालव्यात सोडण्यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणित मानकांनुसार प्रक्रिया करणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या पाणीवाटपाच्या आधारावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प स्थापित केला नसल्यास किंवा पूर्ण क्षमतेने सुरू नसल्यास मंजूर कोटा किंवा प्रत्यक्ष पाणीवापर यापैकी जे अधिक असेल त्याच्या दुप्पट आकारणी होईल.

एक जुलैपासून चालू झालेल्या जलवर्षात घरगुती, औद्योगिक पाणीपट्टीत यापूर्वीच्या निर्णयानुसार दहा टक्के वाढ झाली आहे. राज्य शासनाने शेतीसाठीच्या पाणीपट्टी वाढीला स्थगिती दिली आहे.

- हणुमंत गुणाले, मुख्य अभियंता, जलसंपदा पुणे विभाग

# भुशी डॅम दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना पाच लाखांची मदत

## अजित पवारांची विधानसभेत घोषणा

**लोणावळा । प्रतिनिधी**

लोणावळा भुशी डॅम परिसरात ३० जून रोजी रविवारी एक मोठी दुर्घटना घडली. भुशी डॅमच्या बॅकवॉटरमधील धबधब्यावर एकाच कुटुंबातील पाच जण वाहून गेले. या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्र्यांनी कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. तर भुशी धरण दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या पीडितांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवारांनी विधानसभेत केली.

पावसाळी सहलीसाठी (चेपीप ढीळ) लोणावळ्यातील (डेपरींरश्रर) भुशी धरण (इर्हीहळ ऊरा) परिसरात गेलेल्या कुटुंबासोबत मोठी दुर्घटना घडली आहे. भुशी डॅम परिसरातील धबधब्यामध्ये पुण्याच्या हडपसरमधील अन्सारी कुटुंबातील पाच जण वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली. भुशी धरणाच्या मागील धबधब्यात पाच जणांचं अख्खं कुटुंब वाहून गेलं असून यामध्ये लहान



मुले आणि महिलेचा समावेश आहे. या दुर्घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. भुशी धरण दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या पीडितांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. पॉईंट ऑफ ऑर्डरच्या माध्यमातून भुशी धरण दुर्घटनेतील पीडितांच्या कुटुंबियांना मदत देणे आणि धोकादायक स्थळांवर सुरक्षाव्यवस्था करण्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला होता. याबाबत उत्तर देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, भुशी धरण परिसरातील दुर्घटना दुर्दैवी असून अशा दुर्घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करण्यात येईल. या निधीतून संभाव्य धोकायदायक ठिकाणी प्रतिबंधात्मक माहिती फलक लावणे, कुंपण घालणे, सुरक्षीततेसाठी जाळ्या लावणे आदी कामे करण्यात येतील. पर्यटकांची वर्दळ असलेल्या ठिकाणी माहितीफलक लावणे, सुरक्षिततेच्या उपाययोजना करणे आदी कार्यवाही आधीपासूनच करण्यात येत आहे. त्याच धर्तीवर दुर्गम धोकादायक स्थळीही सुरक्षिततेबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आणि जिल्हा नियोजन अधिकारी यांना देण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सांगितले. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी आणि अपरिचित धोकादायक ठिकाणी जाण्यापासून नागरिकांना रोखण्यासाठी, धोक्याच्या ठिकाणी प्रतिबंधात्मक फलक लावण्यासह आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज राज्यातील सर्व जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस प्रमुखांना दिले.